**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.** : सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु......)

**उप सभापती** : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर काल सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र दराडे हे ऑनलेग होते. आता त्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री.नरेंद्र दराडे : सभापती महोदया, कोरोना महामारी नियंत्रणात आणण्यासाठी महाविकास आघाडी सरकारला मोठ्या प्रमाणावर उपाययोजना कराव्या लागल्या. माननीय मुख्यमंत्र्यांनी "माझे कुटुंब, माझी जबाबदारी" हे अभियान अतिशय उत्तमप्रकारे राबविले. या बरोबरच जीवन आरोग्य तपासणी अभियान देखील राबविले. या बरोबरच ऑक्सीजन, व्हेंटीलेटरची व्यवस्था केली. तसेच राज्यात नवीन ११४ ऑक्सीजन प्लांट उभे केले. कोरोना काळात मृत्युमुखी पावलेल्या व्यक्तीच्या वारसांना ५० हजार रुपये आर्थिक मदत करण्याचे ठरविले आहे. या राज्यात महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना खाजगी रुग्णालयात देखील सुरु करण्यात आली. कोरोना काळात गरजूंना शिवभोजन थाळी आणि अन्नधान्याचा पुरवठा करण्यात आला.

सभापती महोदया, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था म्हणजेच सारथीसाठी २५० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आला आहेत. या बरोबरच नियमित पीक कजफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदान देण्याची मुख्यमंत्री महोदयांनी वचनपूर्ती केली आहे. तसेच भूविकास बँकेच्या ३४,७८८ कर्जदार शेतकऱ्यांची ९६४ कोटी १५ लाख रुपयांची कर्जमाफी दिली आहे. महाविकास आघाडीचे सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी काम

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र दराडे....

करीत आहे. मा.बाळासाहेब ठाकरे कृषी संशोधन केंद्रासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात १०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिला आहे.

सभापती महोदया, रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजनेत केळी, ड्रॅगन फ्रुट, एव्हॅकॅडो, द्राक्षे इत्यादी फळपीके आणि अन्य महत्त्वाच्या मसाला पिकांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे.

सभापती महोदया, गानकोकीळा लता मंगेशकर यांचे नुकतेच निधन झाले आहे. महाविकास आघाडी सरकारने भारतरत्न लता दिनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय शासकीय संगीत महाविद्यालयाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे.

सभापती महोदया, महाविकास आघाडी सरकारने मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहाची योजना राबविली. शबरी घरकुल योजनेसाठी अर्थसंकल्पात ३०० कोटी रुपये उपलब्धकरुन दिले आहेत. तसेच मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे भाग भांडवल ५०० कोटी रुपयांवरुन ७०० कोटी रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदया, राज्यातील कोल्हापूर, पंढरपूर, शिर्डी या तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी अर्थसंकल्पात निधी उपलब्ध करुन दिला आहे. पंढरपूर तीर्थक्षेत्रासाठी ७३ कोटी ८० लाख रुपयांचा निधी उपलब्घ करुन दिला आहे. तसेच शिर्डी येथील विमानतळाच्या विकासासाठी १५० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदया, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ५०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे. गेट वे ऑफ इंडिया वास्तुवर महाराष्ट्राची सांस्कृतिक वैभव दर्शविणारा मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील ध्वनीप्रकाश कार्यक्रम करण्याचे प्रस्तावित आहे.

अप्रकाशित प्रत

श्री.नरेंद्र दराडे....

सभापती महोदया, माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबईतील ५०० चौ.फुटापर्यंतच्या सदनिकांना मालमत्ता करात सूट देण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशयातून १०० मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्प केला आहे. माननीय मंत्री श्री.आदित्यजी ठाकरे यांनी पुढाकार घेऊन मुंबईतील कोस्टल रोडचे जवळजवळ ५० टक्के काम पूर्णत्वास नेले आहे.

सभापती महोदया, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे काम पूर्णत्वास येत आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काल सांगितले की, या महामार्गाचे काम अजून रेंगाळलेले आहे. मी सांगू इच्छितो की, या महामार्गाचे काम वैजापूर पर्यंत पूर्ण झाले असून, मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन आलेलो आहे. मी या महामार्गाने वैजापूर येथून औरंगाबाद येथे केवळ ३० मिनिटांत पोहोचलो. हा महामार्ग नागपूरपर्यंत झालेला आहे.

सभापती महोदया, माननीय नगर विकास मंत्री श्री.एकनाथजी शिंदे यांनी हाती घेतलेले अनेक प्रकल्प आज पूर्णत्वास आलेले आहेत. जालना-नांदेड, नागपूर-गोंदिया-भंडारा या मार्गाचे काम सुद्धा हाती घेतले आहे.

सभापती महोदया, मागच्या सरकारने ओबीसीच्या कल्याणकारी योजनांसाठी हजारो कोटी रुपये देण्यात येतील असे सांगितले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र काहीच झाले नाही. महाविकास आघाडी सरकारने या कामी आयोगाची नेमणूक केली आहे. ओबीसी आरक्षणाच्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या आयोगाने राज्य सरकारला अहवाल सादर केला. सरकारने त्या आयोगाच्या खर्चासाठी मान्यता दिली होती. तसेच ओबीसी आरक्षणाचे विधेयक सुद्धा सभागृहाने संमत केले आहे.

सभापती महोदया, राज्यातील कायदा व सुव्यवस्था आणि महिला सुरक्षिततेच्या बाबतीत सांगायचे झाल्यास मागच्या काळात नागपूर येथील गुंडागर्दीच्या बाबतीत सतत वर्तमानपत्रात बातम्या छापून येत होत्या. परंतु या वर्षी अशा प्रकारच्या बातम्या कोणत्याही पत्रात वाचावयास मिळाल्या नाहीत. यावरुन

श्री.नरेंद्र दराडे....

दिसून येईल की, महाविकास आघाडीचे सरकार कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने अतिशय सक्षमपणे काम करीत आहे. पोलिसांच्या बाबतीत सांगायचे झाल्यास देशात आपल्या पोलिसांचा वरचा नंबर आहे. माननीय गृह मंत्री महोदयांनी ७,२३१ पोलिसांची भरती केली आहे. मागच्या सरकारच्या काळात एकही भरती प्रक्रिया राबविण्यात आली नव्हती.

सभापती महोदया, जात पडताळणी प्रमाणपत्राच्या बाबतीत सांगू इच्छितो की, निवडणुका आणि शिक्षण विषयक कामासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये सुधारणा करावी, अशी मी मागणी करतो. अनेकदा विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र वेळेवर मिळत नाही. त्यामुळे इयत्ता १० किंवा १२ वी नंतर विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात यावी.

सभापती महोदया, राज्याचे माननीय उद्योग मंत्री अतिशय चांगले काम करीत आहेत. मी निदर्शनास आणून देतो की, आसनगांव येथील हजारो उद्योगांनी गुजरात राज्यात स्थलांतर केले, ही खेदाची बाब आहे. तसेच केंद्र सरकारने एयर इंडियाचे कार्यालय मुंबईहून दिल्लीला स्थलंतरित करण्याचा मोठा घाट घातला आहे. महाराष्ट्राची उन्नती करण्याऐवजी गुजरात किंवा अन्य राज्यात उद्योगधंदे नेण्याचा कुटील डाव केंद्र सरकारकडून केला जात असून त्याचा मी निषेध करतो.

सभापती महोदया, पार-तापी-नर्मदा नदीजोड प्रकल्पामध्ये राज्याच्या नार-पार खोऱ्यातील १५ टीएमसी पाणी १२० कि.मी. अंतरावरुन गुजरात राज्यात उत्तरेकडे वळविण्याचा प्रयत्न सुरु आहे. वास्तविक पाहता या प्रकल्पाच्या पाण्यावर आपल्या राज्याचा आहे. गिरणा खोऱ्यातील पाण्याचा कळवण, सटाणा, देवळा, मालेगांव, नांदगांव, चांदवड, येवला आणि जळगांव या तालुक्यांना उपयोग होतो. हे तालुके नेहमी दुष्काळी असतात. त्यामुळे आपल्या राज्याच्या हक्काचे पाणी अन्य राज्याकडे वळविता कामा नये अशी मी मागणी करतो.

श्री.नरेंद्र दराडे....

सभापती महोदया, आमच्या गुरुंनी सांगितलेले आहे की, ज्याची बैलजोडी चांगली त्याची शेती चांगली, ज्याचे कर्मचारी चांगले त्याची संस्था चांगली, ज्याची बायको चांगली त्याचा संसार चांगला आणि ज्याचे मंत्रिमंडळ चांगले त्याचे सरकार चांगले, एवढेच या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प महाविकास आघाडी सरकारने मांडलेला तिसरा अर्थसंकल्प आहे. मागच्याच न झालेल्या गोष्टींचा नव्याने पाढा वाचण्याचे काम आघाडी सरकारने केले आहे हे दिसून येत आहे. शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर निधी देण्याचे २ वर्षे ऐकत आहोत. परंतु कोणत्याही प्रकारे शेतकऱ्यांना तसे दिले नाही, खासकरुन कोकणातील शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम या महाविकास आघाडी सरकारने केले आहे. सन २०२० च्या अर्थसंकल्पाच्या भाषणात देखील पीक कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये देऊ, कोकणातील बागायतदारांना दीड लाख रुपये देऊ असे सांगण्यात आले. बांधावर जाऊन शेतकऱ्यांना पैसे देऊ अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्यावेळी ते मुख्यमंत्री नव्हते त्यावेळी केली होती. कोकणाने त्यांना भरभरुन दिले. कोकणात निसर्ग चक्रीवादळ असेल, तौक्ते वादळ आले, मात्र तेथील बागायतदारांना एक रुपया देखील न देण्याचे काम सरकारच्या काळात करण्यात आले. शेतकऱ्यांच्या बाबतीतील कोणत्याही समस्यांना हात घालण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने केले नाही. बाजारभावात होणाऱ्या बदलाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले, त्याची निश्चित व्यवस्था करण्याची गरज होती. पण त्या विषयावर माननीय अर्थमंत्री एक चकार शब्द देखील बोलले नाहीत. शेतकऱ्यांच्या सर्व पिकांचा प्रश्न, बाजारभावाचा प्रश्न या सर्व गोष्टी तशाच ठेवण्याचे काम या सरकारने कले आहे.

सभापती महोदया, पीक विमा योजनेच्या केंद्र सरकारच्या योजना जर जमत नसतील तर आपण आपली स्वत:ची वेगळी भूमिका मांडावी हे देखील सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनी सातत्याने मांडले आहे. परंतु त्याबाबत देखील कोणतीही स्पष्ट भूमिका अजुनपर्यंत या सरकारच्या माध्यमातून माननीय अर्थमंत्र्यांच्या भाषणात कुठेही दिसलेली नाही. कृषी संशोधनात दूरदृष्टी हवी हा विषय देखील आम्ही मांडला. परंतु कृषी संशोधनात कोणतीही दूरदृष्टी नाही. वातावरण बदलाचा विषय आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. आज राज्यामध्ये

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड ....

त्याबाबत देखील अशीच परिस्थिती दिसून येत आहे. एकंदरित महाराष्ट्राचा अर्थसंकल्प पाहिला तर असे दिसते की, कागदावर मांडल्या बड्या बड्या बाता आणि एकमेकांना देत आहेत लाथा, अशी परिस्थती खरोखर राज्यातील जनतेला पहायला मिळत आहे. अर्थसंकल्पामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांना प्रचंड प्रमाणात म्हणजे ५७ व २७ टक्के एवढा निधी दिला. परंतु ज्या सरकारचे नेतृत्व शिवसेना करीत आहे, त्या शिवसेनाला १३ टक्क्यांची बोळवण करुन सोडण्यात आले. ही अतिशय दु:खदायक बाब आहे. खरे तर आज सभागृहात माननीय मंत्री श्री. आदित्यजी ठाकरे हवे होते. पर्यटनासाठी १४०० कोटी रुपयांचा निधी दिला. परंतु त्यातील ८०० कोटी रुपयांचा निधी बारामतीमध्ये बिबट्या पार्क बांधण्यासाठी दिला. मला वाटते की, बिबट्या पार्क नागपूरमध्ये, चंद्रपूरमध्ये व्हायला पाहिजे होता. परंतु तो बारामतीमध्ये होत आहे. त्याला ८०० कोटी रुपये जात आहेत.

सभापती महोदया, माननीय मंत्री श्री. आदित्यजी ठाकरे यांनी मुंबई व कोकण येथे आम्ही पर्यटन वाढवू, सॅकच्या माध्यमातून रोजगार निर्माण करु असे सांगितले होते. खरोखर ती चांगली योजना होती. माझे याबाबतीत कोणतेही दुमत नाही की, माननीय मंत्री श्री. आदित्यजी ठाकरे यांनी पर्यटनासाठी कोकणात विस्तार करण्याचा प्रयत्न केला. पण संपूर्ण राज्यासाठी फक्त ६०० कोटी रुपयांचा निधी राहिला आणि ८०० कोटी रुपयांचा निधी फक्त पुणे जिल्ह्यात दिला गेला. त्यामुळे हा अर्थसंकल्प राज्याचा आहे की राष्ट्रवादी काँग्रेसचा आहे हा देखील प्रश्न जनतेसमोर आहे. मी आवर्जून एक गोष्ट सांगतो की, "मंजिल तो मिल गई भटककर ही सही, लेकिन गुमराह तो वो है जो घर से निकले ही नही." शिवसेनेला काहीच नाही. माननीय गृह राज्यमंत्री सभागृहाबाहेर गेले आहेत नाही तर त्यांच्यासाठी ही शायरी एकदम योग्य होती.

सभापती महोदया, आज राज्याची परिस्थती काय आहे, जनता किती त्रासात आहे हे पहावे. कोकण, मराठवाडा, विदर्भ बाजूलाच राहिला आहे. कोकण वैधानिक विकास महामंडळाची स्थापना केली जाईल अशा बाता मारल्या गेल्या. परंतु महाराष्ट्रातील जनतेला, कोकणाला, मुंबईला या अर्थसंकल्पात काहीच मिळाले

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड ....

नाही. निश्चितपणे कोकणातील मच्छीमार देखील देखील तसाच राहिला आहे. आपण सभागृहात वारंवार मागणी केली होती. आपण देखील विधानपरिषदेच्या फक्त आमदार असताना या मागण्या केल्या होत्या की, मच्छिमारांना देखील शेतकऱ्यांचा दर्जा दिला पाहिजे. कारण मच्छीमार या मुंबईचा, महाराष्ट्राचा भूमिपूत्र आहे. मच्छिमाराला मुंबईचा भूमिपूत्र म्हणतात. मुंबई कोणाची तर मच्छिमाराची असे बोलले जायचे. आज येणाऱ्या विविध विकास कामांमुळे मच्छिमारी हा व्यवसाय बंद पडू लागला आहे. शेतकऱ्यांना जशी कर्जमाफी दिली जाते, शेतकऱ्यांचे जसे पीक कर्ज माफ केले जाते तसे मच्छिमारांना देखील कोणते तरी कर्ज माफ करावे, मच्छिमारांना कोणता तरी निधी द्यावा ही देखील मागणी आम्ही सातत्याने केली आहे.

सभापती महोदया, शेतकऱ्यांची ३३ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी झाली. भूविकास बँकेचे देखील, ३४७८८ कर्जदारांचे ९६४ कोटी रुपयांचे कर्ज माफ झाले. एनसीडीसी अंतर्गत ४५० ते ५०० कोटी रुपयांचे कर्ज आहे. परंतु शेतकऱ्यांचे ते कर्ज अजुनही माफ केले जात नाही ही देखील मुंबईतील व कोकणातील शेतकऱ्यांची व्यथा आहे.

सभापती महोदया, ३०० कोटी रुपयांचा डिझेल परतावा आहे. मला आठवत आहे की, सन्माननीय मंत्री श्री. अस्लम शेख यांनी मागच्या अधिवेशनात सांगितले होते की, डिझेलचा परतावा तात्काळ जून महिन्यात देऊ. परंतु अजुनपर्यंत ३०० कोटी रुपयांचा डिझेलचा परतावा देखील सरकारने दिलेला नाही. अर्थसंकल्पातील आकडेवारी पाहिली तर गेल्या वेळी हा अर्थसंकल्प ४ लाख ४४ हजार ९० कोटी ६७ लाख रुपयांचा होता आणि आताचा अर्थसंकल्प ५ लाख ४८ हजार ४०७ कोटी ५२ लाख रुपयांचा आहे. जवळजवळ ११.७३ टक्क्यांची वाढ अर्थसंकल्पात झाली आहे. एवढी वाढ झालेली असताना देखील मुंबईकर व कोकणातील आमची जनता अजुनपर्यंत अतृप्तच राहिली आणि या अर्थसंकल्पाच्या फायद्यापासून दूर राहिली हे मी फार निक्षून आपल्यासमोर मांडू इच्छितो.

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड ....

सभापती महोदया, या अर्थसंकल्पामध्ये अंदाजापेक्षा जवळजवळ ३२४६३ कोटी ७ लाख रुपयांनी म्हणजे मागच्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये ७.४८ टक्के कमी खर्च झालेला निधी आहे. सभागृहात विविध पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून पैसे आणले जातात. विविध विकास कामांच्या बाबतीत बोलायचे झाले तर सामाजिक न्यायाचा विषय, महिला व बालविकासाचा विषय, आरोग्याचा विषय, इतर कृषी व संलग्न सेवांचा विषय, सामान्य आर्थिक सेवांचा विषय यामध्ये कुठेही हा निधी वापरता आला असता पण हा देखील वापरला गेला नाही याचे देखील दु:ख आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात सन २०२०-२१ मध्ये ४११४१ कोटी ८४ लाख रुपयांची महसूल तूट दर्शविली आहे. वरील क्षेत्रात ३९४३४ कोटी ३९ हजार रुपयांचा खर्च होणे अपेक्षित होते. परंतु तो देखील झाला नाही. ती तूट यामध्ये दिसून आली आहे. प्रत्येक वेळी मुंबईच्या गोष्टी सांगता. मुंबईवर ३० वर्षे शिवसेनेची सत्ता होती. अर्थसंकल्पामध्ये परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाला एक रुपयाच्या निधीची तरतूद दाखविलेली नाही, ही देखील खेदाची बाब आहे.

असुधारित प्रत

सभापती महोदया, मुंबईमध्ये परमपूज्य डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला निधी नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय जरी न्यायप्रविष्ठ असला तरी दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासाठी निधीची तरतूद करण्यात येते. मात्र ती देखील अर्थसंकल्पात केली नाही याबाबत मी खंत व्यक्त करतो. वित्तीय महसूल वाढ असेल, कर्जांचा डोंगर असेल, पंचसुत्रीच्या नावाखाली गोड, फसवे शब्द असतील, नाकर्तेपणावर पांघरुन घालून महाविकास आघाडीने राज्यातील सर्व जनतेला दिशाहिन करण्याचा हा अर्थसंकल्प आहे हे मला सांगताना बिलकूल खेद वाटत नाही.

नंतर श्री. खर्चे ....

श्री.प्रसाद लाड .......

कोकणाबाबत मी सांगितले आहे, कोल्हापूर, सांगली, सातारा या पश्चिम महाराष्ट्रात नेहमी पूर येतो त्याबाबत कोणतीही व्यवस्था बजेटमध्ये करण्यात आली नाही. काल सभागृहात महसूल मंत्री तसेच माननीय मंत्री श्री. अस्लम शेख यांनी सांगितले की, आम्ही बंधारे बांधू. याबाबत माननीय मंत्री श्री.विजय वडेट्टीवर यांनी भाष्य केले आहे. जे जिल्हे पूरात वाहून जातात त्यामध्ये चिपळूण,सांगली,कोल्हापूर या शहरांसाठी बजेटमध्ये कोणतीही भरीव तरतूद करण्यात आली नाही. सीएनजीवरील टॅक्स १३ टक्क्यांवरुन ३ टक्क्यावर आणला त्याबाबत मी अर्थमंत्री महोदयांचे मनापासून स्वागत करतो. पेट्रोल व डिझेलवर सर्वसामान्य जनता जगते त्यावरील कर कमी केला असता तर सर्वसामान्य शेतकरी, कामगार व जनतेला जी झळ पोहचते ती कमी झाली होती. मागील दोन वर्षापासून नागपूर येथे अधिवेशन घेण्यात आले नाही. त्याची झळ नागपूरवासियांना पोहचली आहे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे हे विदर्भावर बोलतील. मराठवाडा ग्रीडचा विषय आहे, वैधानिक विकास मंडळे कोणत्याही परिस्थिती सुरु करणार नाही असा मनसुबा या सरकारचा आहे तो महाराष्ट्राचा द्वेष करणारा आहे. विदर्भ व मराठवाड्यावर अन्याय करणारा अर्थसंकल्प आहे हे सांगताना मला दु:ख वाटत नाही.

सभापती महोदया, मागील १२० दिवसापेक्षा जास्त काळ एस.टी.कर्मचाऱ्यांचा संप सुरु आहे. परिवहन मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, एस.टी.च्या माध्यमातून सर्व सामान्य जनता ग्रामीण भागातून प्रवास करते. एस.टी.मधून जेथे १०० रुपयात प्रवास केला जातो तेथे खाजगी वाहनासाठी लोकांना ४०० रुपये द्यावे लागत आहेत. १२० दिवसानंतर मंत्री महोदय ॲड.अनिल परब यांनी पुढाकार घेतला तरी महाविकास आघाडी शासनातील ज्येष्ठ मंत्री मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशानंतर एस.टी.संप मिटवित नाही. इयत्ता १२ वीच्या परीक्षा सुरु आहेत. आज पासून इयत्ता १० वीच्या परीक्षा सुरु होत आहेत. या विद्यार्थ्यांनी २०० ते ३०० रुपये रिक्षाला देऊन परीक्षेला जायचे काय ? असा प्रश्न ग्रामीण भागातील जनतेला पडलेला आहे. मंत्री महोदय ॲड.अनिल परब यांनी बैठकीत सांगितले की,

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड....

या अधिवेशन कालावधीत एस.टी.चा प्रश्न निकाली काढण्यात येईल. उप सभापती महोदया त्या बैठकीला उपस्थित होत्या. काल हा विषय सुरु असताना त्यांनी निदेश दिले होते की, अधिवेशन संपण्याअगोदर एस.टी.कर्मचाऱ्यांच्या संपाचा विषय निकाली निघेल. हा संप मिटविण्याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी परवानगी दिली आहे. अर्थमंत्री महोदयांकडे काही कारणासाठी ती फाईल थांबलेली आहे. तसे निवेदन अर्थ राज्यमंत्री महोदयांनी काल सभागृहात केले. हे अधिवेशन २५ मार्चला संपणार आहे त्या अगोदर मंत्री महोदय एस.टी. कर्मचाऱ्यांच्या संप मार्गी लावतील अशी मला खात्री आहे. संप मिटला तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील सर्व सामान्य जनतेला जी झळ पोहचते ती पोहचणार नाही व त्यांच्या मनाला शांती मिळेल अशी काळजी मंत्री महोदयांनी घ्यावी."बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले" असे आपण नेहमी म्हणतो. पंचसुत्रीच्या नावाखाली महाराष्ट्रातील जनतेला गृहित धरुन वेड्यात काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. अर्थसंकल्पातून पोपटपंची करण्यात आली असे मला वाटते. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या काळात ज्या योजना मुंबईत सुरु करण्यात आल्या त्यामध्ये एमएमआरडीएच्या माध्यमातून २७० किलोमीटरचा मेट्रो प्रकल्प, अंडरग्राऊंड मेट्रो, रो-रो प्रकल्प असेल, महानगरपालिकेसोबत एकत्र येऊन सीलिंक प्रकल्प असेल, नाव्हा-शिवा रायगडचा प्रकल्प असेल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांची अशी मागणी होती की, मुंबईला रायगडपासून २० मिनिटात जोडावे. सन्माननीय सदस्य व श्री.देवेंद्र फडणवीस यांची मैत्री पाहता हा प्रकल्प तात्काळ सुरु केला गेला. त्यावेळी शिवसेना सरकारमध्ये होती. मंत्री महोदय ॲड.अनिल परब आपण मुंबईचे ज्येष्ठ नेते आहात. दळणवळणाचा विषय असेल, पाण्याच्या टॅक्सीचा विषय असेल, सीलिंक चा विषय असेल. सन २०२२ मध्ये हे प्रकल्प कार्यान्वित होऊन जनतेला आम्ही सपूर्द करणार होतो. परंतु मेट्रो कारशेडच्या बालहट्टामुळे आम्ही ते करु शकलो नाही. त्याबाबत आम्ही कोणाला दोष देत नाही. एखादा प्रकल्प बंद पाडला तर त्याचा पर्याय द्यायला पाहिजे. त्यासाठी मुंबई महानगरपालिकेची जागा द्यायला पाहिजे होती. आपण जी जागा सांगितली ज्या जागेचे टायटल क्लीअर नाही. कोणत्या विषयाचा विचार करुन हा प्रकल्प पुढे

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड.....

आणला आहे. याचे उत्तर महाराष्ट्रातील जनतेला हवे आहे. मेट्रोच्या माध्यमातून लाखो लोक प्रवास करणार होते त्यांचा प्रवास २०२४ पर्यंत पुढे गेला आहे.

सभापती महोदया, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनला या सरकारने विरोध केला. परंतु मुंबई-हैद्राबाद बुलेट ट्रेन आणण्याचा हे सरकार प्रयत्न करीत आहे. समृध्दी महामार्गाला या सरकारने विरोध केला होता. आज समृध्दी महामार्गाचे श्रेय लाटण्यासाठी माननीय मंत्री हेलिकॉप्टरने जाऊन फोटोग्राफी करतात. या समृध्दी महामर्गाचे श्रेय माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांना आहे हे विसरुन चालणार नाही. श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात झालेला विकास आपणाला लपविता येत नाही. त्या प्रकल्पाचे महत्व त्यांना द्यायचे नाही. आम्ही असे म्हणतो की, आपण महत्व देऊ नका. परंतु जी कामे त्यांनी केली त्या माध्यमातून जनतेसमोर त्यांचे नाव विकासपुरुष म्हणून आले आहे. त्यांनी जो विकास केला ती कामे पूर्ण करुन त्यांची उद्धाटने करा. जनतेला माहिती आहे की, हे सरकार उद्धाटन करणारे आहे. विकास कामे करणारे हे सरकार नाही. या सरकारमध्ये भ्रष्टाचार, अंतर्गत कलह, एस.टी., शेतकरी, आरक्षण, महिला अत्याचार, महिला बलात्कार हे प्रचंड विषय गाजत आहेत. राज्याचे दोन मंत्री तरुगांत आहेत. कोविड काळात झालेला भ्रष्टाचार जनतेने पाहिला. कोविड काळात तुम्ही जनतेला कसे धारेवर धरले ते पाहिले. केंद्राने दिलेल्या निधीतून कामे केली, केंद्राकडून आलेले व्हेंटीलेटर धूळखात पडले हे जनतेने पाहिले आहे.

सभापती महोदया, मंत्री महोदय ॲड.अनिल परब हे मुख्यमंत्री महोदयांच्या अतिशय जवळचे आहेत. माझी विनंती आहे की, अर्थसंकल्पाच्या उत्तरामध्ये या सर्व विषयांवर उत्तरे आली पाहिजे. अर्थ राज्यमंत्री किंवा अर्थमंत्री उत्तर देतील किंवा माननीय मुख्यमंत्री सभागृहात हजर राहिले तर आणखी चांगले होईल. आम्ही जनतेचे प्रश्न पोटतिडकीने मांडत आहोत, त्याची माहिती जनतेला मिळाली पाहिजे.

सभापती महोदया, छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक करण्यात येईल असे अर्थसंकल्पात नमूद केले आहे. अर्थसंकल्पात नमूद केल्याप्रमाणे मी विनंती करतो की, छत्रपती यांचे स्मारक व्हावे ही आमची व सर्व जनतेची इच्छा आहे. मागील दोन

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड....

वर्षापासून विधानसभा व विधानपरिषदेमध्ये केंद्र सरकारकडे औरंगाबाद शहराचे नाव बदलून संभाजीनगर करण्याचा प्रस्ताव सादर करायचा आहे. तो प्रस्ताव मुख्यमंत्री महोदयांकडे सात दिवसात सादर करावा अशी माझी अपेक्षा आहे. मागील तीन वर्षापासून स्व.वसंतराव नाईक यांचे स्मारक व्हावे हा विषय मी सभापतीसमोर सातत्याने मांडत आहे. या स्मारकासाठी २० कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. कोठे माशी शिंकली ते कळत नाही, त्यामुळे स्व.वसंतराव नाईक यांचे स्मारक होऊ शकले नाही. हे स्मारक नागपूरला व्हावे अशी मागणी करण्यात आली होती. त्या स्मारकाचे काय झाले. याचे उत्तर अर्थमंत्री महोदयांनी द्यावे अशी माझी विनंती आहे. स्व.शिवाजीराव देशमुख हे या सभागृहाचे सभापती साडेचार वर्षे होते. त्यांचे स्मारक कोकरुडमध्ये करण्यासाठी मी २० कोटी रुपयांची मागणी केली होती. माननीय सभापती श्री.रामराजे नाईक निंबाळकर यांनी ही मागणी सभागृहात मान्य केली होती. २० कोटी रुपयांचा निधी दिला जाईल असे निदेश दिले होते. विधानपरिषदचे सभापती पद ज्यांनी साडेचार वर्षे उपभोगले त्यांच्या स्मारकाला या सरकारकडून निधी दिला जात नाही, ही खंत माझ्या मनात आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड.......

सभापती महोदया, आपण आम्हाला न्याय द्याल अशी मला अपेक्षा आहे. मी सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांच्या वीज तोडणीचा शॉक देणारा, एसटी कर्मचाऱ्यांच्या तोंडातील घास पळविणारा, युवकांना बेरोजगार करणारा, कोविडची आकडेवारी लपविणारा, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या भावनांशी खेळणारा, मुंबई शहराला खोटी स्वप्ने दाखविणारा, कोकणी माणसाला गृहीत धरणारा, असा या वर्षी सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प आहे.

"पिते दूध डोळे मिटूनी जात मांजराची,
मनी चोरट्याच्या का रे भीती चांदण्यांची,
सरवल्या हातांनी कंप का सुटावा,
उजेडात होते पुण्य, अंधारात पाप,
ज्याचे त्याचे हाती आहे कर्तव्याचे माप,
दुष्ट दुर्जनांची कैसी घडे लोकसेवा,
महाराष्ट्राची जनता म्हणते उघड दार देवा आता उघड दार देवा."

सभापती महोदया, माननीय संसदीय कार्यमंत्री ॲड.अनिल परब, माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री.अमित देशमुख साहेब सभागृहात उपस्थित आहेत. विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्रजी फडणवीस जनतेचे प्रश्न, दहशतवादाचे प्रश्न सभागृहात मांडण्याचे काम करीत आहेत. त्यांनी सभागृहात सीडी देखील सादर केलेली आहे. दाऊद इब्राहीम केवळ गुंड नाही तर तो इंटरनॅशनल दहशतवादी आहे. विधानसभेचे माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी दाऊद इब्राहीम यांची पोलखोल करण्याचे काम केलेले आहे. मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेचे माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या संरक्षणाबाबत आढावा घेऊन त्यांच्या संरक्षणात वाढ करावी, अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड.......

सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

---------

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदया, आपण मला सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार मानतो.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी अर्थसंकल्पावर बोलताना कविता म्हणून दाखविली. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र दराडे यांनी देखील अर्थसंकल्पाला समर्पक अशी कविता सादर केली. परंतु त्यावेळी अनेक सन्माननीय सदस्यांचे त्यांनी सादर केलेल्या कवितेकडे लक्ष नव्हते. त्यामुळे मी ती कविता पुन्हा वाचून दाखवितो.

"ज्याची बैलजोडी चांगली त्याचे शेत चांगले,

ज्याचे कर्मचारी चांगले त्याची संस्था चांगली,

ज्याची बायको चांगली त्याचा संसार चांगला,

ज्याचे मंत्रिमंडळ चांगले त्याचे सरकार चांगले."

सभापती महोदया, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत सहभागी होताना मला अतिशय आनंद होत आहे. मागील ३ वर्षात राज्याने वेगवेगळ्या क्षेत्रात अतिशय चांगली प्रगती केलेली आहे. माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार साहेब सन २०१९ मध्ये राज्याचे वित्तमंत्री होते. त्यावेळी त्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प आणि त्यानंतर सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये माननीय वित्तमंत्री श्री.अजित पवार साहेबांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाची तुलना केली असता असे दिसून येथे की, ग्रॉस स्टेट डोमेस्टीक प्रोडक्ट, टोटल एक्सपेंडिचर, टोटल रेव्हेन्यू रिसिट, किंवा रेव्हेन्यू डेफिसिट या सर्व तुलनेत यावर्षी सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प अतिशय चांगला आहे. यावर्षी सादर केलेला अर्थसंकल्प राज्यातील १२.५ कोटी जनतेला न्याय देणारा आहे. वित्तमंत्री महोदयांनी या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सर्व घटकातील लोकांना न्याय देण्याचे काम केलेले

श्री.अभिजीत वंजारी.......

आहे. युवक, क्रीडा, महिला, शिष्यवृत्ती, शिक्षण क्षेत्र, आरोग्य क्षेत्राला न्याय देण्याचे काम या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. त्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, सन २००५ मध्ये Maharashtra Fiscal Responsibility and Budget Management Act लागू करण्यात आला होता. राज्याची आर्थिक पॉलिसी कशी असली पाहिजे, वित्त आयोग, केंद्र शासनाच्या वतीने जो निर्देशांक येतो, जी पॉलिसी ठरविली जाते त्या माध्यमातून राज्यात किती प्रकारचा रेव्हेन्यू डेफिसिट असला पाहिजे, किती फिस्कल डेफिसिट असला पाहिजे या संदर्भात मार्गदर्शक सूचना केल्या जातात. वित्तमंत्री महोदयांनी त्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन अतिशय चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे. आपण सन २०२२-२३ मध्ये शिक्षण क्षेत्रात इतर राज्यांच्या तुलनेत १६.३ टक्के एकूण एक्सपेंडिचर मांडलेले आहे. आरोग्य क्षेत्रात ४.६ टक्के, ॲग्रीकल्चर सेक्टर ६ टक्के, रुरल डेव्हलपमेंट सेक्टर ४.६ टक्के, पोलीस विभागासाठी ५ टक्के आणि रोड व ब्रिजेससाठी ५.७ टक्के अशा प्रकारे अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पॉलिसी जाहीर करण्यात आलेली आहे. राज्याला अत्यंत चांगल्या पद्धीने इकॉनॉमी एस्कलेट करता येईल याचे सुद्धा अर्थसंकल्पाच्या माध्यमातून नियोजन करण्यात आले आहे. सीएनजीवर १३.५ टक्के व्हॅट कर लागू होता. आता तो ३.५ टक्के करण्यात आलेला आहे. त्यामुळे सर्व सामान्य लोकांना दिलासा मिळेल. आपण अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विकासाची पंचसुत्री आत्मसात केलेली आहे. त्या माध्यमातून ॲग्रीकल्चर, हेल्थ, ह्युमन रिसोर्सेस, ट्रॅान्सपोर्ट, इंडस्ट्री अशा सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी करण्याचे काम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून होणार आहे. शासनाने राज्यातील जवळपास २० लाख शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देण्याचे जाहीर केले होते. आपण अर्थसंकल्पाच्या माध्यमातून ते अनुदान देण्याचे निश्चित केले आहे, ही अत्यंत चांगली गोष्टी आहे. केंद्र शासनाकडून जे निर्देश प्राप्त झालेले आहेत त्या

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी.......

निर्देशांचे पालन करुन अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सर्व सामान्य जनतेला आणखी कशा पद्धतीने भरीव मदत करता येईल यासाठी प्रयत्न करण्यात आलेला आहे. मला या निमित्ताने काही सूचना करावयाच्या आहेत. माझी विनंती आहे की, १५ व्या वित्त आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आणि जे पॅरामिटर्स आहेत त्याप्रमाणे आरोग्य क्षेत्रात ८ टक्क्यापेक्षा जास्त एक्सपेंडिचर करण्याची आवश्यकता होती. आपण सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात ४.७ टक्के एक्सपेंडिचर दाखविलेला आहे. माझी विनंती आहे की, आपण ज्यावेळी सुधारीत अंदाजपत्रक तयार कराल त्यावेळी यामध्ये वाढ करुन ते ८ टक्क्यापेक्षा अधिक करण्यात यावे. मागील २ वर्षात संपूर्ण जगात कोरोना महामारी पसरली होती. आरोग्य विभागाने व वैद्यकीय शिक्षण विभागाने कोरोना महामारीची परिस्थिती अत्यंत चांगल्या प्रकारे हाताळली. कोरोना काळात आरोग्य सुविधांवर मोठ्या प्रमाणावर खर्च झालेला आहे. भविष्यात आरोग्य सुविधा अधिक बळकट करण्याची आवश्यकता आहे. कोरोना सारख्या महामारीला सामोरे जाताना सर्व सामान्य जनतेला कमीत कमी पैशात दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी आरोग्यावर ८ टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, राज्य मागील १० वर्षात वित्त व नियोजनाच्या बाबतीत रेव्हेन्यू सरप्लस नाही. या संदर्भात जे पॅरामिटर्स आहेत त्यांचा आणखी अभ्यास करुन आपले राज्य कर्नाटक राज्याच्या तुलनेत सरप्लस असले पाहिजे यासाठी आपल्याला प्रयत्न करावयाचा आहे. सन २०१७ मध्ये देशात जीएसटी लागू झाला. जीएसटी लागू झाल्यानंतर प्रत्येक राज्याता ५ वर्षे कॉम्पेन्सेशन ग्रँट देण्यात आली. ते ५ वर्षे दिनांक ३० जून २०२२ रोजी पूर्ण होणार असल्यामुळे केंद्र शासनाकडून मिळणारी कॉम्पेन्सेशन ग्रँट बंद होणार आहे. त्यामुळे तो भार आपल्या रेव्हेन्यू रिसिटवर पडणार आहे. त्यामुळे राज्याला रेव्हेन्यू वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कसरत करावी लागणार आहे. राज्याला तो आर्थिक भार कसा पेलता येईल याबाबत देखील आपल्याला विचार करावा लागणार आहे. आपण वेगवेगळया प्रकारच्या सर्व्हिसेस,

श्री.अभिजीत वंजारी.......

सॅलरीच्या माध्यमातून फी घेतो, फाईन घेतो. आपल्याला त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर नॉन टॅक्स रेव्हेन्यू कलेक्ट करावा लागणार आहे. जीएसटी कॉम्पेन्सेशन ग्रँट बंद झाल्यानंतर राज्य शासनाला रेव्हेन्यूची कमतरता भासता कामा नये या दृष्टिकोनातून आपल्याला प्रयत्न करावा लागणार आहे. माननीय वित्तमंत्री श्री.अजित पवार साहेब अर्थसंकल्पाच्या माध्यमातून तो प्रयत्न करतील असा मला पूर्ण विश्वास आहे. राज्याला सन २०२०-२१ मध्ये केंद्र शासनाकडून जीएसटी कॉम्पेन्सेशन ग्रॅंटच्या अगेन्स्ट ६७०० कोटी रुपये घ्यावयाचे आहेत. तसेच, जून २०२३ पर्यंत केंद्र शासनाकडून जीएसटी कॉम्पेन्सेशन ग्रॅंटच्या अगेन्स्ट जवळपास ३५ हजार कोटी रुपये घ्यावयाचे आहेत. केंद्र शासनाने राज्याला तो निधी लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावा. जेणे करुन राज्य शासनाला त्या माध्यमातून राज्याची अर्थव्यवस्था आणखी बळकट करण्याचा प्रयत्न करता येईल. केंद्र शासनाने सन २०१७ मध्ये जीएसटी पॅटर्न लागू केल्यानंतर राज्याला मिळणाऱ्या महसुली जमेमध्ये आणखी वाढ व्हावयास पाहिजे होती. मागील ५ वर्षापूर्वी राज्यात जो व्हॅट व सर्व्हिस टॅक्स गोळा केला जाता होता त्याचा कॉन्टम मोठा होता. परंतु सन २०१७ मध्ये जीएसटी लागू केल्यानंतर मागील ५ वर्षात आपण तेथपर्यंत पोहोचलो नाही, हे दुर्दैवाने सांगावेसे वाटते. म्हणून येणाऱ्या काळात जीएसटीच्या स्लॅबमध्ये बदल करावयाचा की काय अशा प्रकारचा प्रयत्न केंद्र शासनाच्या मान्यतेने आपल्याला करावा लागणार आहे. माननीय वित्तमंत्री श्री.अजित पवार साहेबांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री.सांगळे.......

श्री.अभिजीत वंजारी....

परंतु या अर्थसंकल्पामध्ये काही त्रुटी आहेत. तसेच आमच्या त्यासंबंधी काही मागण्या आहेत. शासनाने त्याची दखल घेतली पाहिजे. अर्थसंकल्पामध्ये ग्रंथालय अनुदाकरिता १२२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु सन २०२०-२१ मधील त्याबाबतचे ४६ कोटी रुपयांचे थकीत अनुदान राहिलेले आहे. ते अद्याप मिळालेले नाही. माझी सदनाच्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, ग्रंथालय अनुदानाकरिता करण्यात आलेल्या १२२ कोटी रुपयांच्या तरतुदीमध्ये वाढ करण्याची गरज आहे. आपल्या राज्यातील विविध तालुक्यांमध्ये १२ हजारांपेक्षा जास्त ग्रंथालये आहेत. माझा विभाग असलेल्या नागपूरमध्ये ११४७ पेक्षा जास्त ग्रंथालये आहेत. या ग्रंथालयांची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी मी याबाबत माझी भूमिका सदनामध्ये मांडली होती. माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने ग्रंथालय अनुदानाकरिता येणाऱ्या अंदाजपत्रकामध्ये १२२ कोटी रुपयांवरुन १६८ कोटी रुपयांपर्यंत वाढ करावी.

सभापती महोदया, मराठी भवनासंबंधी उल्लेख करण्यात आला आहे. मराठी भवन ही काळाची गरज आहे. मराठी भाषेचे संवर्धन करण्याची गरज आहे. त्यात विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र किंवा खानदेश असो, या सर्व भागांमध्ये मराठीचे उपकेंद्र सुरु करायची आहेत. परंतु त्याकरिता करण्यात आलेली ५० कोटी रुपयांची तरतूद पुरेशी नाही. श्री.श्रीपाद जोशी सल्लागार समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी ५ वर्षांपूर्वी मराठी भवनासाठी १०० कोटी रुपयांची मागणी केली होती. अशा परिस्थितीत ५ वर्षांनंतर मराठी भवनासाठी शासनाने फक्त ५२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही तरतूद अत्यल्प आहे. येणाऱ्या काळात त्या तरतुदीमध्ये वाढ करण्याची गरज आहे.

सभापती महोदया, विदर्भात १,३४,४३१ हेक्टर सिंचन क्षमता असणारा गोसीखुर्दचा राष्ट्रीय प्रकल्प आहे. हा प्रकल्प चिमूर लोकसभा मतदारसंघात आहे. तत्तकालीन लोकसभा सदस्य श्री.विलास मुत्तेमवार आमचे नेते होते. सन १९९८ मध्ये स्व.राजीव गांधी यांच्या हस्ते सदर प्रकल्पाचे उद्घाटन झाले होते. तेव्हा सदर

श्री.अभिजीत वंजारी....

प्रकल्पाची मूळ किंमत फक्त ३७२ कोटी रुपये इतकी होती. परंतु शासनाची त्या प्रकल्पासाठी उदासीनता असल्यामुळे तो प्रकल्प अद्याप पूर्ण होऊ शकला नाही. सन २०२१ मध्ये सदर प्रकल्पासाठी १८ हजार कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्पाकरिता राज्याच्या अर्थसंकल्पात ८५४ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ती तरतूद अपुरी आहे. सदर प्रकल्प डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करायचा असल्यास त्याकरिता शासनाला दीड हजार कोटी रुपयांचा निधी द्यावा लागणार आहे. माझी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती आहे की, येत्या पुरवणी मागण्यांमध्ये सदर निधीची तरतूद करावी. गोसीखुर्द प्रकल्पामध्ये पुनर्वसनाचे प्रश्न तसेच बॅक वॉटरमुळे काही गावांना सातत्याने होणारा त्रास आज देखील कायम आहे. त्यामुळे गोसीखुर्द प्रकल्प पूर्ण होण्यासाठी शासनाने दीड हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यासंबंधी मी सदनाच्या वतीने शासनाकडे मागणी करीत आहे.

सभापती महोदया, अनेक प्रकारच्या प्रकारच्या शिक्षण संस्था, विद्यापीठे आणि कृषी विद्यापीठांकरिता शासनाने ५०-५० कोटी रुपयांचे अनुदान जाहीर केले आहे. माझी या निमित्ताने विनंती आहे की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला पुढील वर्षी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. मी आमदार झाल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार नागपूरला आल्यानंतर मी त्यांच्याकडे मागणी केली होती की, विद्यापीठाला १०० वर्षे पूर्ण होण्याच्या निमित्ताने दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ ते ५ ऑगस्ट, २०२३ या काळात विविध कार्यक्रम केले जाणार आहेत. शासनाने त्याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला चांगले पॅकेज द्यावे म्हणून मी १०० कोटी रुपयांची मागणी केली होती. नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये झालेल्या बैठकीमध्ये मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार त्यांच्याकडे दिलेल्या पत्रावर ५० कोटी रुपयांचे एंडॉर्समेंट दिले होते. मी या निमित्ताने माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे अभिनंदन करतो. तसेच उर्वरित असलेले ५० कोटी असे एकूण १०० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे शासनाने येणाऱ्या सुधारित अंदाजपत्रकात १००

श्री.अभिजीत वंजारी....

कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मी विनंती करतो. आपण एलआयटीसारख्या संस्थेला १० कोटी रुपये दिले मी त्याबद्दल आपले अभिनंदन करतो.

सभापती महोदया, नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. माननीय श्री.अमित देशमुख राज्याचे मंत्री आहेत. ते सदनात उपस्थित आहेत. मी याबाबत मागील पावसाळी अधिवेशनामध्ये देखील मागणी केली होती की, नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. छत्तीसगड, मध्य प्रदेश व आजूबाजूच्या राज्यातील रुग्ण तेथे मोठया प्रमाणात वैद्यकीय उपचार घेण्यासाठी येत असतात. अशा प्रकारे मध्य भारतातील चांगले नावाजलेले सदर रुग्णालय आहे. तेथे आणखी चांगल्या प्रकारे विद्यार्थी आणि रुग्णांची सोय व्हावी आणि त्यास ७५ वर्षे पूर्ण होत असल्यामुळे अमृत महोत्सवी कार्यक्रमासाठी विविध प्रकारचे पॅकेजेस मागितले आहेत. आम्ही त्याकरिता ५०० कोटी रुपयांची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांना कन्व्हेंन्शन सेंटरकरिता मोठी इमारत बांधायची आहे. तसेच वातानुकुलित वसतिगृहासाठी दोन वेगळया इमारती बांधायच्या आहेत. संपूर्ण परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमरे बसवायचे आहेत. तसेच विविध प्रकारे साहित्य व मशीनरी उपलब्ध करुन रुग्णांना कमी दरामध्ये जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे वैद्यकीय उपचार कसे घेता येतील असा आम्हाला प्रयत्न आहे. म्हणून मी या निमित्ताने केलेली मागणी शासनाने मंजूर करावी अशी मी आपल्या मार्फत मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदया, राज्यात शासनाकडून इंफ्रास्टक्चर तसेच अनेक जिल्हाधिकारी कार्यालयांच्या नुतनीकरणासाठी करोडो रुपये खर्च केले जातात. अर्थसंकल्पामध्ये महिला व बालभवनकरिता तरतूद केलेली आहे. माझी सदनाला विनंती आहे की, अर्थसंकल्पावर चर्चा करीत असताना राज्यातील प्रत्येक मुख्यालयामध्ये किमान एक पदवीधर भवन बांधले पाहिजे. अर्थसंकल्पामध्ये पदवीधरांकडे ज्याप्रमाणे लक्ष द्यावयास पाहिजे होते तसा केंद्रबिंदु अर्थसंकल्पातून दिसून येत नाही. राज्यातील सर्व पदवीधरांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने वन

श्री.अभिजीत वंजारी....

स्टॉप सोल्युशन केले पाहिजे. त्यांच्या स्वयंरोजगाराकरिता कार्यशाळा, करियर कौन्सिलिंग, पोस्ट ग्रॅज्युएशन, अद्ययावत डिजीटली लायब्ररी अशा विविध कामांसाठी शासकीय जमीन उपलब्ध करुन देऊन राज्यामध्ये पदवीधर भवन सुरु करावे अशी माझी मागणी आहे. आमच्या विदर्भातील स्वर्गीय डॉ.श्रीकांत जिचकार साहेब यांनी अतिशय लहान वयामध्ये विदर्भ आणि महाराष्ट्रात राजकारणामध्ये मोठी छाप पाडली होती. आम्हाला डॉ.श्रीकांत जिचकार साहेब यांच्या रुपाने अत्यंत विद्याविभूषित व्यक्तीमत्त्व बघण्यास मिळाले. त्यांनी महाराष्ट्रात केलेल्या कार्याचा उजाळा आणि त्यांची आठवण पुढील पिढीला होत रहावी याकरिता स्वर्गीय डॉ.श्रीकांत जिचकार यांच्या नावाने पदवीधर भवन निर्माण करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, राज्यातील एमबीबीएस व आयुर्वेदिक डॉक्टरांना सातवा वेतन आयोग व त्याचे अलाऊन्सेस मिळणे असतील, समाज कार्य, महाविद्यालये असतील, अकृषी विद्यापीठांच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे काही प्रश्न असतील असे सर्व प्रश्न आपण सोडवले पाहिजेत. शासनाने यासाठी पुढाकार घ्यावा अशी मी विनंती करतो व माझे मनोगत पूर्ण करतो, धन्यवाद.

जय हिंद !

---------

असुधारित प्रत

## शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंबंधी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन

श्री.बाळाराम पाटील : सभापती महोदया, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. तळोजा ॲडीशनल अंबरनाथ एमआयडीसीला जोडण्यासाठी एमआयडीसीने २८ वर्षांपूर्वी तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावून रस्ता आणि पाईपलाईनची कामे केली. २८ वर्षांपासून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी असलेले उत्तरदायित्व शासनाने पाळलेले नाही. मी या संदर्भात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी उद्योग मंत्री यांनी मला त्याबाबत आश्वासन दिले होते. आता शेतकरी उपोषणाला बसलेले आहेत. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने आश्वस्त केले होते. परंतु कालपासून सांप्रदाय क्षेत्रातील भगवान महाराज पाटील व त्यांचे इतर सहकारी शेतकरी कालपासून उपोषणाला बसलेले आहेत.

सभापती महोदया, माझी या निमित्ताने विनंती आहे की, शेतकऱ्यांचा २८ वर्षांपासून प्रलंबित असलेला भूसंपादनाचा हक्क त्यांना मिळवून देण्याच्या दृष्टीने आपण शासनाला निर्देश द्यावेत.

**उप सभापती** : ठीक आहे.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी.:** अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.:** सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे सुरु...

श्री.रामराव पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, आपण मला सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये बोलण्याची संधी दिली मी त्याबद्दल आपला आभारी आहे. काल सदनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी अर्थसंकल्पावर सखोल आकडेवारीसह आपले मनोगत व्यक्त केलेले आहे. मी त्यांच्याशी पूर्णत: सहमत आहे. मी मराठवाडा येथील नांदेड जिल्हयातील नायगाव तालुक्यातील राजूळ या लहान गावातून येतो. दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ ते १७ सप्टेंबर, २०२३ या काळात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त अमृत महोत्सव साजरा केला जाणार आहे. परंतु त्याकरिता अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही किंवा त्याबाबत साधा उल्लेख देखील करण्यात आला नाही. उलट २ वर्षांच्या काळात संभाजी नगरला मंत्रिमंडळाची बैठक देखील झाली नाही. हीच परिस्थिती नागपूरला अधिवेशन घेण्यासंबंधी झाली आहे. एका बाजूला अर्थसंकल्पात नवीन वीज जोडणीसाठी तरतूद केली जाते. दुसरीकडे सुरु असलेला वीज पुरवठा वीज तोडणी करुन बंद केला जातो.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.रामराव पाटील .....

काल आमच्या नांदेड जिल्हयातील लोहा तालुक्यातील हिरापुरी तांडा, खिरु तांडा, रुपला तांडा, देवळा तांडा व इतर तांडा व गावात वीज कनेक्शन तोडण्याची मोहिम चालू आहे. त्याची खात्री संबंधित अधिकाऱ्यांकडून मी व सन्माननीय सदस्य श्री.निलय नाईक यांनी कालच करुन घेतली आहे. आमच्या नांदेड जिल्हयाच्या भाग तेलंगणा व कर्नाटकच्या दोन्ही सीमा भागाला जोडला गेलेला आहे. या भागात दळणवळण व्यवस्था म्हणावी तेवढी चांगली नाही. देशाची जीवनवाहिनी असलेला रेल्वमार्गही नाही. मात्र २०१५ मध्ये रेल्वे मंत्रालयाने दक्षिण मध्य रेल्वे सिकंदराबाद मार्फत बिदर देगलूर नांदेड अशा लोहमार्ग सर्वेक्षणाचे आदेश दिले आहेत. त्याचे संपूर्ण सर्वेक्षण होऊन सन २०१८-२०१९ च्या काळात अहवाल सादर झाला आहे. सध्या बिदर नांदेड रेल्वे असून याचा मार्ग बिदर उदगीर परळी परभणी नांदेड असा असून ३०० किलोमीटरचा आहे. नवीन सर्वेक्षण केलेला मार्ग बिदर, हाणेगाव, नरसी, नायगाव असा मार्ग १५५ किलोमीटरचा आहे. याचा एकूण खर्च २३५४ कोटी २० लक्ष रुपये असून तो प्रस्ताव रेल्वे बोर्ड दिल्ली यांच्याकडे सादर झालेला आहे. केंद्र सरकारने नवीन बिदर नांदेड लोहमार्गास तांत्रिक मान्यता दिली आहे व याचा आरओआर + १.५७ असा आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र व कर्नाटक राज्याला जोडणारा आहे. त्यामुळे रेल्वे मंत्रालयाने दोन्ही राज्य सरकारला सहभागी होण्यासाठी त्या राज्यांच्या मुख्य सचिवांना दिनांक ६.८.२०२१ रोजी पत्र दिले आहे, त्यामध्ये होणाऱ्या खर्चाचा ५० टक्के वाटा व जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत उल्लेख आहे. पण आजपर्यंत महाराष्ट्र सरकारने त्यास होकार दिला नाही. याबाबत अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद नाही. राज्य सरकारने मागास असलेल्या तेलंगणा, कर्नाटकच्या सीमा भागाचा कोपरा नांदेड असल्याने या रेल्वेमार्गास त्वरीत मान्यता देऊन टोकन रक्कम थोडी तरी जाहिर करावी अशी विनंती आहे. या उलट कर्नाटक सरकारने योग्य दिशेने पाऊल टाकले आहे. एकीकडे मातोश्री पांदण रस्ता ही महत्वाकांक्षी योजना राबवून शेतकऱ्यासाठी सोय करुन देत आहोत. दुसरीकडे चालू असलेले रस्ते व पाणीपुरवठा बंद करीत आहोत. मौजे मुंगी, ता.शेवगाव, जि.अहमदनगर येथील जायकवाडी कालवा वितरीका नंबर ५ वर व गट नंबर ४१२ व ४१३ वर अतिक्रमण

असुधारित प्रत

श्री.रामराव पाटील .....

झाले असून शेताला जाणारा रस्ता बंद झाल्याने शेकडो शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. या विषयी दिनांक ४ मार्च २०२२ रोजी माझा तारांकित प्रश्न प्राथम्य क्रमांक ५ होता. त्यादिवशी कामकाज तहकूब झाल्याने चर्चा झाली नाही व लेखी उत्तर अपुरे व असमाधानकारक आहे. सदरील प्रकरणी दिनांक १२.८.२०२१ रोजी अतिक्रमण काढण्याची व नुकसान दुरुस्ती करुन देण्याची नोटीस देण्यात आली होती. पुन्हा दुसऱ्यांदा जायकवाडी पाटबंधारे विभागाकडून वरिष्ठ पातळीवर दिनांक ८.११.२०२१ रोजी देखील नोटीस देण्यात आलेली आहे पण त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी सदरील विषयी शासकीय कामात अडथळा, शासकीय मालमत्तेचे नुकसान व अतिक्रमण केल्याबाबत दोषींवर गुन्हा दाखल करावा असा विनंती अर्ज दिनांक २०.२.२०२२ रोजी पोलीस निरीक्षक, शेवगाव, जि.अहमदनगर यांना जलसंपदा विभाग, नाथनगर दक्षिण, पैठण यांनी तक्रार दिलेली आहे. दोषींवर कारवाई न करता जाणीवपूर्वक राजकीय दबावामुळे टाळाटाळ करण्यात येत आहे. हा प्रकार घडून एक वर्ष झाले आहे, उत्तरात अतिक्रमण झाले आहे हे मान्य करुन पूर्ण काम प्रगतीपथावर आहे असे सांगितले जाते पण प्रत्यक्षात आजपर्यत कोणतीही कारवाई झालेली नाही. संबंधित सर्व पत्रव्यवहार मी सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहे. या विषयी माननीय जलसंपदा मंत्री श्री.जयंत पाटील यांना भेटून कार्यवाही करण्याबाबत सांगितले. दुसरे एक माननीय राज्यमंत्री आरोपिंना पाठिशी घालत असून अर्जदारांना मदत करण्याऐवजी अर्जदारांवर खोटे गुन्हे दाखल करुन त्यांना धमक्या देण्यात येत आहे. याविषयी अधिकृत पुरावे माझ्याकडे आहेत. आपल्या माध्यमातून या प्रकरणाची चौकशी करुन दोषींना व त्यांना पाठिशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी ही विनंती.

सभापती महोदया, काल सभागृहात काही सन्माननीय सदस्य विरोधी पक्षाच्या आमदारांना आमदार निधीवरुन उपहासात्मक बोलले आहेत. २५:१५ चा निधी, समाजकल्याण निधी, तांडा वस्ती निधी, अल्पसंख्याक निधी, इतर रस्त्यांच्या निधीबाबतही त्यांनी बोलावे. बहुमाताच्या जोरावर विरोधी पक्षाच्या आमदारांचा

श्री.रामराव पाटील .....

स्थानिक निधी कमी करता येत असेल तर त्यांनी करावा. हा अर्थसंकल्प बहुतांशी केंद्र सरकारच्या निधीवर अवलंबून असून आयजीच्या जिवावर बायजी असाच आहे. एकंदरीत हा अर्थसंकल्पात तीन पक्षाचा गल्लासुत्री कार्यक्रम असून त्यास पंचसुत्री अर्थसंकल्प असे गोंडस नाव देण्यात आलेले आहे. तरी हा तिघाडी सरकारचा महाराष्ट्र विघाडीचा कार्यक्रम आहे. प्रत्येक खात्याचे मंत्री स्वत: त्या त्या खात्याचे मुख्यमंत्री आहेत. जिल्हयाचे पालकमंत्री त्या त्या जिल्हयाचे मुख्यमंत्री आहेत. प्रत्येकाने त्या त्या खात्यात वसूली मंत्री म्हणून सचिन वाझेसारखे व्यक्ती नेमले आहेत. धन्यवाद.

उप सभापती : मी सांगू इच्छिते की, आपण नवीन सदस्य आहात, सर्वांना पटणारे नसले तरी तुमचे मुद्दे चांगले आहेत. मी आपणास सांगू इच्छिते की, आपण जसेच्या तसे भाषण वाचू शकत नाही, मुद्यांचा संदर्भ घेऊ शकता. तुम्ही नवीन आहात, तुम्ही सभागृहात बोलण्याची संधी मिळवली हीच मोठी गोष्ट आहे, काही हरकत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रेकॉर्डवर असू नये म्हणून सांगतो. केंद्र सरकारला जीएसटीमार्फत जास्तीत जास्त उत्पन्न देण्याचे काम महाराष्ट्र करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी आयजीच्या जीवावर बायजी असे म्हटले आहे पण तसे नाही. देशातील सर्वात जास्त उत्पन्न मुंबईतून दिले जाते.

उप सभापती : तुम्ही तुमच्या भाषणात तसे सांगावे, यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी हे भाषण सुरु करतील.

----

श्री.अमोल मिटकरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चेत माझे विचार व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

खोटे सिक्के जो खुद नहीं चले बाजार में,

वो भी कमियां खोज रहे है आज मेरी किरदार में,

महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारचे नेतृत्व श्री.उध्दव ठाकरे हे करीत आहेत व त्यांची प्रतिमा आहे.

यह अलग बात है कि खामोश खड़े रहते है,

फिर भी जो लोग बड़े है वो बड़े रहते है,

ऐसे दरवेशों से मिलता है हमारा शिजरा,

जिनके जुतो में दिल्ली के कई ताज पड़े रहते है."

सभापती महोदया, सिजरा म्हणजे समुह, टीम या अर्थाने मी सांगत आहे. विरोधी पक्षाचे सदस्य झुंड असे म्हणत आहेत, गँगस्टरला गँगच दिसेल. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी २२ मिनिटे भाषण केले आहे, पण मी तेवढा वेळ घेणार नाही. पण काही महत्वाच्या बाबींवर मला बोलायचे आहे. महाराष्ट्रावर मोठी संकटे तौक्ते वादळ, चक्री वादळ आदी संकटे आली.

सभापती महोदया, रात्रंदिन आम्हाला युध्दाचा प्रसंग असे तुकाराम महाराजांनी म्हटलेले आहे. हे सरकार सत्तेवर आले तशी अनेक संकटे येत गेली. पण मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे मनापासून अभिनंदन करतो की, मागील दोन वर्षात कोरोना महामारीच्या अवघड काळात मोठया धैर्याने व कार्यकुशलतेने मंत्रिमंडळाच्या सहकार्याने महाराष्ट्राला या संकटातून सावरले हे निश्चितच कौतुकास्तपद आहे. हे मी म्हणत नसून प्रोजेक्ट टूडे चा अहवालानुसार आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० च्या दरम्यान नवीन गुंतवणूक आकर्षीत करुन घेण्यात महाराष्ट्र हा देशात पहिल्या स्थानावर होता.

अस्धारित प्रत

यानंतर श्रीमती नाफडे

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी.......

आता महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार देशातील परदेशी गुंतवणूकीतील महाराष्ट्राचा २८ टक्के इतका वाटा आहे. तसेच, यंदा भारताचा विकास दर ८.९ टक्के इतका असला तरीही महाराष्ट्राचा विकास दर १२ टक्क्यांवर जाऊन पोहोचलेला आहे. राज्याचे नेतृत्त्व तर काही मोदीजी करीत नाहीत. ज्यांचा विकास पुरुष म्हणून आतापर्यंत गौरव केला, तेही राज्याचे नेतृत्त्व करीत नाहीत. राज्याचे नेतृत्त्व आदरणीय उद्धवजी ठाकरेजी करीत आहेत. महाराष्ट्राचा विकास परग्रहावरील कोणत्या माणसाने केलेला नाही. एखाद्या सरकारला सतत बदनाम करायचे, त्या सरकारतर्फे जर काही चांगल्या गोष्टी घडून येत असतील तर त्या मान्यच करायच्या नाहीत. याशिवाय कोणी विकासच करु शकत नाही. विकास शब्दाबद्दल सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड बरेच वक्तव्य केलेले आहे. विकास शब्दाचा मागील पाच वर्षात इतका धस्का महाराष्ट्राच्या जनतेने घेतलेला आहे की, जर एखाद्या ठिकाणी लहान बाळ जन्माला आले तर त्याचे नाव विकास ठेवायचे म्हटले तरीही साशंकता निर्माण होत होती. कारण मागील पाच वर्षांमध्ये महाराष्ट्रातील जनतेने विकासच पाहिला नव्हता.

सभापती महोदया, राज्याला व राज्यातील जनतेला प्रगतीपथावर नेणारा विकासाचा पंचसुत्री संकल्प करत कोरोना महामारीमुळे मंदावलेल्या राज्याच्या आर्थिक विकासाला गती देणारा व सर्व समाजघटकांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प आहे.

सभापती महोदया, केंद्र सरकारचा जीडीपी घसरलेला होता. केंद्र सरकारने आपल्या जीएसटीचा पैसा थकविला होता,अशा वेळी देखील आमदारांना त्यांचा पूर्ण विकास निधी आदरणीय अर्थमंत्री यांनी दिलेला आहे. इतकेच नाही तर आमदार निधीत घवघवीत वाढ देखील केलेली आहे. त्यातील एक कोटी रुपये कोरोनाकरिता ठेवून त्याकरिता खर्च करण्याचे आव्हान देखील केले होते. केंद्र शासनाने एक छदाम देखील दिलेला नसताना सर्व आमदारांना स्थानिक आमदार विकास निधी दिलेला आहे.

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी......

सभापती महोदया, अर्थसंकल्प कितीही परिपूर्ण असला तरीही विरोधकांना त्यामध्ये उणीवा दिसणारच आहेत. विरोधक शेवटी कशातही उणीवाच शोधतील. तुकाराम महाराज म्हणतात

" आंधळयासी जन अवघे चि आंधळे,

आपणासि डोळे दृष्टी नाही. "

हा अभंग मी शेवटी देखील सांगणार आहे. हे आता नित्याचेच झालेले आहे. कोरोना महामारीतून सावरत असताना लढाई अद्याप संपलेली नाही. त्यामुळे बढाई मारणाऱ्यांनी मोठया बढाया मारण्यात अर्थ नाही. त्यातून काहीही साध्य होणार नाही. यातून एकच संदेश घ्यावा, कारण की, महाराष्ट्रासारख्या औद्योगिक दृष्टया अतिशय सुधारलेल्या परंतु कोरोनाचा इतर राज्यांपेक्षा अधिक प्रभाव राहिलेला असताना त्याचे भान राखून, प्रदीर्घ काळाची लढाई असल्याने दिशादर्शन धोरण, सातत्य, आत्मविश्वास, सबुरीची गरज असल्याचे सांगत माननीय अर्थमंत्री महोदयांनी अर्थसंकल्पामध्ये याबाबत मोठा निर्धार दाखविलेला आहे. कोरोनाग्रस्त अर्थव्यवस्था रुळावर आणण्याचे प्रयत्न देशभरात सुरु आहेत. तिसरी लाट नियोजनातून आटोक्यात आली, त्यामुळे निर्बंध शिथिलीकरणातून आर्थिक आणि व्यापारीकरणाची दारे हळूहळू खुले होत आहे. मी येथे आकडयांचा खेळ मांडणार नाही. विरोधी पक्षातून आकडयांचे खेळ आलेले आहेत.

"तेरा मेरा मनवा एक कैसा हुई रे,

तु कहे कागज लेखी,

और मैं कहूं आखन देखी रे"

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी.......

सभापती महोदया, महाराष्ट्रात ज्या ज्या वेळी संकटे आली, त्यावेळी प्रत्यक्ष फील्डवर जाऊन पाहणी करण्यात आलेली आहे. आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार, आदरणीय श्री.अजित पवार, महाविकास आघाडी सरकारचे मुख्यमंत्री महोदय आदरणीय श्री.उद्ध्वजी ठाकरे असतील या सर्वांनी प्रत्यक्ष जाऊन केलेली आहे. आम्ही जी ग्राऊंड रियालिटीच या निमित्ताने मांडण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहोत. महाराष्ट्र महाविकास आघाडी सरकारमध्ये निश्चितच महाराष्ट्राच्या दृष्टीने एक आशादायी चित्र महाराष्ट्रात निर्माण झालेले आहे. यामध्ये संकटाच्या काळात देखील मोठया हुशारीने मार्ग काढत माननीय अर्थमंत्री महोदयांनी कृषी,आरोग्य, दळणवळण, मनुष्यबळ विकास आणि उद्योग या पंचसुत्रीवर भर दिलेला आहे. याकरिता लक्षणीय तरतुदी करत राज्याची अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर आणण्याचा व दूरदृष्टीने निर्णय घेऊन राज्याला प्रगतीच्या दिशेने नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न झालेला आहे.

सभापती महोदया, शेतीच्या बाबत अनेक लोक बोलले की, शेतकऱ्याच्या तोंडाला पाने पुसलेली आहेत.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.अमरनाथ राजुरकर)**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा उल्लेख केला गेलेला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेमध्ये अर्पण –पत्रिका लिहिलेली आहे. त्यात असे म्हटलेले आहे की, "तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो आणि सकळांचे लक्ष तुझ्याकडे वळो, मानवतेचे तेज झळझळो, विश्वा माझिया योगे, या राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेला सामोरे ठेवून महाराष्ट्र महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानलेले आहे. शेती राज्याच्या केंद्रस्थानी असणारा विषय त्यामुळे बळीराजाला दिलासा देणाऱ्या अनेक योजना या अर्थसंकल्पामध्ये माननीय अर्थमंत्री महोदयांनी मांडलेल्या आहेत. भू-विकास बँकेचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी केलेला आहे. भू-विकास बँकेच्या ९६४ थक बाकीदार शेतकऱ्यांना ९३४ कोटी रुपयांचे कर्ज माफ केलेले आहे. नियमित कर्ज फेडणाऱ्या राज्यातील २०,००,००० शेतकऱ्यांना प्रत्येकी

श्री.अमोल मिटकरी......

५०,००० रुपयांचे अनुदान देण्याची योजना सरकारने अर्थसंकल्पात आणल्याने त्याबद्दल सरकारचे आभार मानले पाहिजे. त्याच बरोबर ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या बळकटीकरणासाठी २००० कोटी रुपयांची योजना जाहीर केलेली आहे. बाजार समित्यांनी पायाभूत सुविधांसाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजाची १०० टक्के परतफेड शासनाकडून करण्यात येणार आहे. शेतमालासाठी किमान आधारभूत किंमत कृषी निर्यात धोरण डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत सन २०२२-२०२३ मध्ये ९११ कोटी रुपये निधी सुमारे ४३,१२,००० शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. अशा अनेक योजना शेतकऱ्यांच्या बळी राजाच्या हिताच्या दृष्टीने महाराष्ट्र महाविकास आघाडी सरकारने मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. देशी गाई-म्हशीची उत्पादकता वाढविण्याकरिता विदर्भ मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी प्रत्येकी एक अशा एकूण ३ मोबाईल प्रयोग शाळा स्थापन करण्यात येणार असल्यामुळे शेतकऱ्यांना उच्च उत्पादन क्षमता असणाऱ्या गाई-म्हशी उपलब्ध होणार आहेत.

सभापती महोदया, महाराष्ट्राचा हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांच्या दृष्टीने दिलासा देणारा आहेच, याबद्दल शंका असण्याचे काही कारण नाही. या अर्थसंकल्पाचे जर एका शब्दात वर्णन करायचे असेल तर ०४ राज्यांच्या निवडणुकीचा जो उसना आनंद विरोधकांना झाला होता, दुसऱ्या दिवशी अर्थसंकल्प ऐकल्यानंतर त्यांचा तो आनंद हवेत विरघळून गेलेला आहे. असा हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांच्या दृष्टीने शेतकऱ्यांना न्याय देणारा ठरलेला आहे. शेतकऱ्यांची उत्पादकता प्रगतीशील शेतकऱ्यांच्या बरोबरीने आणण्यासाठी येत्या तीन वर्षात १००० कोटी रुपये निधी देण्यात आलेला आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेनुसार महिला शेतकऱ्यांसाठी ३० टक्के तरतूद वाढवून ५० टक्के इतकी करण्यात आलेली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत बदल करण्याची विनंती माननीय पंतप्रधान यांना भेटून माननीय अर्थमंत्री यांनी केली होती, ती मान्य झाली नाही. याबाबत राज्य शासन अन्य पर्यायांचा विचार करेल,असे स्पष्टपणे अर्थसंकल्पीय भाषणातून आदरणीय अर्थमंत्री महोदयांनी

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी......

सांगितलेले आहे. महाविकास आघाडी सरकार हे कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी त्यांच्या हिताचे निर्णय घेण्याकरिता सक्षमपणे उभे आहे. असे या अर्थसंकल्पातून दिसून येते.

सभापती महोदया, धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांचा विचार केला तर अष्टविनायक, पंढरपूर देवस्थान या बरोबर स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त महापुरुषांशी संबंधित गावातील दहा शाळांकरिता दहा कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. त्यात गाडगेबाबांचे जन्मगांव आहे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जन्मगाव आहे. सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्या शाळेमध्ये शिकले, ती प्राथमिक शाळा या सर्वांकरिता सरकाने दहा कोटी रुपये दिलेले आहेत, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करीत आहे.

स्वातंत्र्य लढ्याशी निगडित स्थळे मुंबई, पुणे, नागपूर येथे विकासासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. रायगड किल्ला विकासाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. रायगड किल्ला विकासाकरिता देखील तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदया, आपल्याला आठवत असेल की, मागील सरकारच्या काळात किल्ले भाडयाने देण्याचा देखील उपद्व्याप केला गेला होता. मात्र या सरकारने महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे जे किल्ले आहेत, त्यात रायगड किल्ल्याच्या विकासाकरिता १०० कोटी रुपये दिलेले आहेत. राजगड, तोरणा, शिवनेरी, सुधागड, विजयदुर्ग व सिंधुदूर्ग या सहा किल्ल्यांच्या विकासाकरिता १४ कोटी रुपयांची तरतूद करुन ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा मानस महाविकास आघाडी सरकारने दाखविलेला आहे.

सभापती महोदया, त्याचप्रमाणे छत्रपती संभाजी महाराजांचा विषय यापूर्वी सभागृहात काढला गेला होता. संभाजी महाराजांचे नाव आले की परत औरंगाबाद शहराचा मुद्दा उकरुन काढण्याचा रतीब सातत्याने विरोधकांकडून सुरु असतो. छत्रपती संभाजी महाराजांना आजपर्यंत उपेक्षितच ठेवले गेलेले आहे. केंद्र सरकारने परवानगी द्यावी आणि औरंगाबादचे संभाजी नगर असे नामकरण होईल.

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी.......

हे केंद्र शासनानेच अडवून ठेवलेले आहे. हेही महाराष्ट्राला हे माहिती आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा मुद्दा आला की, परत धर्माचे राजकारण केले जाते. आजपर्यंत छत्रपती संभाजी महाराजांना उपेक्षितच ठेवले गेले. एवढेच काय तर मागील काळात चुकीचा इतिहास सांगणाऱ्यांना पुरस्कृत केले गेलेले आहे. माझ्या महाविकास आघाडी सरकारने भीमा इंद्रायणी तीरी वळु तुळा संगमावरील मृत्युंजय संभाजी पाहून मृत्यूही थिजला आणि बाळ येथे निजला, शिवाचा बाळ येथे निजला, ज्या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराजांनी औरंगजेबाशी लढताना उत्तर प्रदेशाने औरंगजेबाचे मांडलिकत्त्व स्वीकारलेले आहे. महाराष्ट्रात छत्रपती संभाजी महाराजांच्या नेतृत्त्वात औरंगजेबाशी मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत लढा दिलेला आहे, ते स्थळ म्हणजे वळु तुळापूर या ठिकाणी महाराष्ट्र सरकारने अडीचशे कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. फुले शाहु बाबासाहेब आंबेडकर यांच्याच विचारधारेचा आदर्श ठेवत आघाडी शासनाने महात्मा जोतिराव फुले स्मारक, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या महान समाज सुधारक दाम्पत्त्याचे निवासस्थान असलेला महात्मा फुले वाडा राज्य संरक्षित वारसास्थळ असलेल्या स्मारकाच्या विस्तारीकरणाकरिता १०० कोटी रुपयांची मदत शासनाने केलेली आहे.

यानंतर श्री.सोनावणे......

अप्रकाशित प्रत

श्री. अमोल मिटकरी......

त्याचप्रमाणे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मारकासाठी राजगडाच्या पायथ्याशी असलेल्या छत्रपती संभाजी राजाच्या मातोश्री महाराणी सईबाई राणीसाहेब स्मृतीस्थळासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करुन राज्यातील थोर वारसांच्या विचारांचा ठेवा जतन करण्याचा व तो पुढील पिढीला मार्गदर्शक व्हावा आणि त्यामधून त्यांचे विचार आणि कार्याचा प्रचार, प्रसार व्हावा याकरिता सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद केलेली असून, त्याबद्दल मी माननीय वित्तमंत्री महोदयांचे आभार मानतो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना केंद्रबिंदू ठेऊन हा अर्थसंकल्प डोळ्यासमोर ठेवल्यानंतर

"पाहुनी सौख्य माझे, देवेंद्र तोही लाजे,

शांती सदा विराजे या झोपडीत माझ्या"

असे राष्ट्रसंताचे भजन आठवल्याशिवाय राहत नाही. मी सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दटके यांना सांगू इच्छितो की,

" तुफां तो इस शहर में अक्सर आता है,

देखें अब कि किसका नंबर आता है,

यारों के दांत भी बहुत जहरीले है,

लेकिन हमको भी सापों का मंतर आता है. "

एवढेच या निमित्ताने सांगतो आणि शेवटी हा सुंदर अर्थसंकल्प महाविकास आघाडी सरकारने विधानसभेत आणि विधानपरिषदेत सादर केलेला आहे. असे असतानासुध्दा विरोधक सातत्याने टीका करीत आहेत. यावर तुकाराम महाराजांनी असे उत्तर दिलेले आहे की,

"आंधळयाशी जन, अवघेचि आंधळे

आपणाशी डोळे दृष्टी नाही,

रोग्या विषतुल्य लागे हे मिष्टान्न

असुधारित प्रत

तोंडाशी कारण चवी नाही,

तुका म्हणजे शुध्द नाही जो आपण

तया त्रिभुवन अवघे खोटे"

श्री. अमोल मिटकरी......

जी माणसे शुध्द नाहीत त्यांना सर्व असत्यच दिसते. त्यांना त्रिवार असत्यच दिसते. माननीय वित्तमंत्री महोदयांचे लक्ष विदर्भावर आहे. त्यातल्यात्यात नागपूर आणि विशेष लक्ष अकोला जिल्ह्यावर सुध्दा आहे. अकोल्यात देखील दळणवळणाची अनेक साधने आहेत, याची सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांना माहिती आहे. अकोला जिल्ह्यात शेतकरी, आरोग्य आणि पांदण रस्त्यांचे प्रश्न आहेत. सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात काही कमी मिळाल्यास....सभागृहातील किती सन्माननीय सदस्य अर्थसंकल्प वाचतात हा देखील एक महत्वाचा प्रश्न आहे. विदर्भ किंवा त्यातल्यात्यात अकोला जिल्हा हा सर्वांत महत्वाचा जिल्हा समजला जातो. अकोला जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सुध्दा संबंधित सन्माननीय सदस्यांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. जर काही राहून गेले असल्यास सन्माननीय सदस्यांनी पाठपुरावा करावा, अशी मी विनंती करीत आहे. माननीय वित्त मंत्री श्री. अजितदादा पवार हे आपल्याला भरभरुन देतील हे सभागृहातील सन्माननीय सदस्यांना माहिती आहे. पूर्वी सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी ८ विभाग सांभाळलेली आहेत. अकोला जिल्ह्यातील विमानतळ लवकरात लवकर सुरु झाले पाहिजे. नागपूर जिल्ह्यातील लोकांना जाण्यासाठी आणि येण्यासाठी सोपे आहे. अकोला जिल्ह्यातील लोकांना मुंबई जवळ असली पाहिजे त्याकरिता अर्थसंकल्पात भरीव तरतूद करता आली असल्यास चांगलेच आहे. जर अर्थसंकल्पात तरतूद केली नसल्यास सन्माननीय सदस्यांनी पाठपुरावा करावा, अशी मी त्यांना विनंती करीत आहे. महाविकास आघाडी सरकार कोणालाही नाराज करणार नाही. मला माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्याची संधी

दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण येथेच संपवितो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

------

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. मध्यप्रदेश सरकारच्या नावे असलेली जमीन धारावीमधील ५ एकर जमीन महाराष्ट्र सरकारने मुंबई महानगपालिकेच्या व्हिलेज ट्रिटमेंट प्लॅनसाठी दिली आणि ती संपादितही केली. जमिनीचा निवाडा होऊन जमीन मालकांना मोबदलाही देण्यात आला. या जमिनीवर बेकायदेशीर कब्जा करुन त्यासाठी मोठमोठे व्यापारी गोदामे आणि व्यावसायीक गाळे उभारण्याचे काम सुरु केले आहे. या गाळयाच्या विक्रीतून ५०० ते ६०० कोटी रुपयांचा व्यवहार करण्यात आला आहे. अनधिकृत बांधकामाविरुध्द आवाज उठविला म्हणून शेकाप पक्षाच्या संबंधित कार्यकत्याच्या विरोधात खोटे गुन्हे नोंदविण्यात आले. शेकाप पक्षाचे प्रमुख कायकर्ते श्री. अखत्तर हुसेन याला रंगेरेज दिनांक, २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी बेदम मारहाण करण्यात आली. त्याला फरफटत नेऊन मारहाण करण्यात आलेली आहे, याची व्हिडीओ क्लिप माननीय गृह राज्यमंत्री महोदयांना मी पुढील कार्यवाही देणार आहे. संबंधित पोलिस यंत्रणेने कोणतीही दखल घेतली नाही. मी आजपर्यंत जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्याची माननीय गृह राज्यमंत्री महोदयांनी दखल घेतलेली आहे. सामाजिक कार्यकर्त्याला बेदम मारहाण करण्यात आलेली आहे. एक वेगळा धंदा झालेला आहे. पोलिसांच्या संरक्षणाखाली ही हजारो एकर जमीन हडप करण्याचे काम सुरु आहे. यासंदर्भातील गुन्हा पोलिसांकडून नोंदवून घेतला जात नाही. ज्या कार्यकर्त्याला मारहाण झालेली आहे, त्याच्याकडून गुन्हा नोंदवून घ्यावा आणि संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही म्हणून त्यांच्या विरोधात कारवाई करावी, अशी माझी पॉईंट आफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून विनंती आहे.

श्री. शंभुराज देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी पॉईंट आफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून एका गंभीर प्रकरणाकडे लक्ष वेधले असून, त्यासंदर्भातील इथ्यंभूत माहिती त्यांच्याकडून घेऊन चौकशी केली जाईल आणि चौकशीअंती दोषी पोलिसाच्या विरोधात नियमानुसार कारवाई केली जाईल.

----------

**पृ.शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.** : सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु......

असुधारित प्रत

श्री. अंबादास दानवे (औरंगाबाद तथा जालना स्था.प्रा.संस्था) : सभापती महोदय, सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपण मला अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल सर्वात प्रथम मी आपले आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, राज्याचा अर्थसंकल्प दोन्ही सभागृहाला सादर झालेला आहे. या अर्थसंकल्पाचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की, हा अर्थसंकल्प पूर्णत: करवाढ नसणारा आणि अधिकाअधिक सवलत देणारा आहे. साधारणपणे अर्थसंकल्पात करवाढ किती केली जाते आणि सवलती कोणत्या कमी केल्या जातात याच गोष्टीची चर्चा होत असते.

सभापती महोदय, सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून लोकाभिमूख निर्णय कसे घेता येतील हेच या अर्थसंकल्पातून दाखवून दिलेले आहे. या अर्थसंकल्पावर अनेक वक्त्यांनी त्यांची मते मांडलेली आहेत. मी कोणतीही राजकीय चर्चा करणार नाही. महाराष्ट्र हा सर्वांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. त्या हेतून काय होते आणि काय झालेले आहे हे बघितले पाहिजे. दोन वर्षापूर्वी महाविकास आघाडीचे सरकार राज्यात स्थानापन्न झालेले आहे. अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांची कर्जमुक्तीची घोषणा करण्यात आलेली आहे. त्यावेळी शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याचे महाविकास आघाडी सरकारने जाहीर केले होते. परंतु, मधल्या

काळात कोरोनाच्या महामारीमुळे महाविकास आघाडी सरकारला आर्थिक कारणास्तव प्रोत्साहनपर अनुदान देता आले नाही. महाविकास आघाडी सरकारने कृषी विभागाचा उल्लेख करताना ५० हजार रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांना

असुधारित प्रत

श्री. अंबादास दानवे......

देण्यासाठीची घोषणा केली असून, ती अतिशय महत्वाची आहे. जी लोक नियमित कर्जे भरतात त्यांना कोणत्याही प्रकारे अनुदान मिळत नाही. म्हणून नियमित कर्जे फेडण्यासाठी हे प्रोत्साहनपर अनुदान राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने खूप महत्वाचे ठरणार आहे.

सभापती महोदय, मी मराठवाड्यातील विविध प्रश्नांवर बोलणार आहे. या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पातून मराठवाड्यासाठी भरीव अशी तरतूद करण्यात आलेली आहे. मी प्रत्येक विषयावर बोलणार नाही. अर्थसंकल्पात सर्व बाबी नमूद केलेल्या आहेत.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे.....

सभापती महोदय, जालना येथे ३६५ खाटांचे नवीन प्रादेशिक मनोरुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून ही बाब सर्वात महत्त्वाची आहे. सभापती महोदय, संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मोठी परंपरा आहे. मराठवाड्याच्या मुक्ती संग्रामाशी या महाविद्यालयाची नाळ जुळलेली आहे. या महाविद्यालयाच्या विकासासाठी राज्य सरकारने प्रथमच एवढी मोठी भरीव तरतूद केलेली आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या उपक्रमाच्या तरतुदीत अजून वाढ केली पाहिजे, अशा प्रकारची मागणी मी करतो.

सभापती महोदय, राज्यातील अनेक जिल्ह्यांच्या ठिकाणी १०० खाटांच्या महिला व नवजात शिशु रुग्णालयाला मान्यता देण्यात आली आहे. या बाबतीत मराठवाड्यातील हिंगोली व संभाजी नगरचा उल्लेख करता येईल. संभाजीनगर हे मोठे महानगर झाले आहे. बुलढाणा, वाशिम, नाशिक, जळगांव आणि आजूबाजूचे जिल्हे मराठवाड्याशी संबंधित आहेत. मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात निधी देण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केलेला आहे. संभाजीनगर किंवा जालन्याचा उल्लेख करीत असताना सांगू इच्छितो की, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यासाठी देखील मोठ्या प्रमाणात निधी दिलेला आहे.

सभापती महोदय, पर्यटनाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, जगातील आठ आश्चर्यांमध्ये अजिंठा आणि वेरुळ लेण्यांचा समावेश आहे. मागील १५-२० वर्षांपूर्वी त्या ठिकाणी मोठे सुविधा केंद्र उभे केले होते. परंतु ते सुविधा केंद्र उद्घाटन झाल्यापासून आजपर्यंत बंद होते. राज्याचे माननीय पर्यटन मंत्री श्री.आदित्यजी ठाकरे त्या ठिकाणी आले आणि त्यांनी त्या सुविधा केंद्राची दुरवस्था बघितली. त्यांनी त्या सुविधा केंद्रासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी उपलब्ध करुन दिला आहे.

सभापती महोदय, या वर्षीच्या अर्थसंकल्पात मराठवाड्यातील धाराशीव, हिंगोली, परभणी, नांदेड या जिल्ह्यांसाठी वेगवेगळया पद्धतीने भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. आपल्याला कल्पना आहे की, जालना-नांदेड या द्रुतगती

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे.....

मार्गाच्या भूसंपादनाची गती उल्लेखनीय आहे. जवळजवळ ८० टक्के भूसंपादन झालेले आहे. मराठवाड्याच्या दृष्टीने विविध बाबी होत असतानाच वसमत येथील कृषी संशोधन केंद्रात हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी संशोधन करण्यात येणार आहे. हा प्रकल्प सुद्धा अतिशय महत्त्वाचा आहे. या प्रकल्पासाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाबतीत बोलताना सांगू इच्छितो की, राज्यातील २७० सिंचन प्रकल्प प्रगतीपथावर असल्याचे अर्थसंकल्पात नमूद आहे. मी निदर्शनास आणून देतो की, मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प मागच्या काळात सुरु करण्याबाबत घोषणा झाली होती. या मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पासाठी पैठणसाठी ३७५ कोटी रुपये आणि गंगापूर, वैजापूरसाठी ७००-८०० कोटी रुपये येणार आहेत. माझी मागणी आहे की, मराठवाडा वॉटर ग्रीडसाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात अधिक तरतुदीची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सरकारने महत्त्वाकांक्षी असलेला नदीजोड प्रकल्प जाहीर केला आहे. नाशिक येथून गुजरात राज्यात पाणी जात असल्याचा विषय सभागृहात उपस्थित झाला होता. कोकणातील पावसाचे पाणी वाहून जाते. परंतु जे अतिरिक्त पाणी आहे त्यासाठी सरकारने नदीजोड प्रकल्प हाती घेण्याचे ठरविले होते. या नदीजोड प्रकल्पाचा उल्लेख या वर्षीच्या अर्थसंकल्पात करण्याची आवश्यकता होती, असे मला वाटते.

सभापती महोदय, रोजगार हमी योजना अतिशय महत्त्वाची योजना आहे. केंद्र सरकारने मनरेगाचा २५ टक्के निधी कमी केला आहे. मागच्या वर्षी केंद्राच्या अर्थसंकल्पात ७३ हजार कोटी रुपये तरतूद होती, परंतु या वर्षी ५८ हजार कोटी रुपये ठेवले आहेत. याचाच अर्थ केंद्र सरकारने २५ टक्के कमी तरतूद केली आहे. परंतु राज्य सरकारने मात्र अर्थसंकल्पात रोजगार हमी योजनेसाठी आणि फलोत्पादनासाठी भरीव तरतूद केली आहे, याबद्दल या सरकारने निश्चितपणे अभिनंदन केले पाहिजे.

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे.....

सभापती महोदय, केंद्र सरकारने अन्न, खत आणि इंधनावरील अनुदानात १ लाख १५ हजार कोटी रुपयांची कपात केली आहे. विरोधी बाजूचे सदस्य राज्य सरकारच्या कारभारावर केवळ टीका करीत असतात. परंतु त्यांनी टीका करीत असताना केंद्राच्या अर्थसंकल्पाकडे देखील लक्ष दिले पाहिजे. केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पावर राज्याचा अर्थसंकल्प अवलंबून असतो. परंतु केंद्र सरकारने अन्न, खत आणि इंधनावर १ लाख १५ हजार कोटी रुपयांची कपात केल्यामुळे आगामी काळात अन्न, खत आणि इंधनामध्ये दरवाढ अटळ आहे. काही जण म्हणतात की केंद्राच्या जीवावर राज्य सरकार चालते. मी त्यांना सांगू इच्छितो की, केंद्रामध्ये जेवढा कर जमा होतो त्यामध्ये एकट्या मुंबई आणि महाराष्ट्रातून ३८ टक्के कर जातो. आपण जेवढा कर देतो त्या तुलनेत केंद्र सरकार आपल्याला परतावा देत नाही. उलट आपल्या हिश्श्याच्या तुलनेत कमी पैसे देते. मी एवढेच सांगू इच्छितो की, या अर्थसंकल्पात रोजगार हमी योजनेसाठी राज्य सरकारने भरीव तरतूद केली आहे.

सभापती महोदय, काल सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, बैलगाडा शर्यतीसाठी माननीय क्रीडा मंत्र्यांनी पुढाकार घेतला. त्यांनी सांगितले की, बैलगाडा शर्यतीला खेळाचा दर्जा दिलेला आहे. काल सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी यांनी सूचना केली होती की, आमदार निधीतून ज्याप्रकारे विविध क्रीडा स्पर्धा घेण्यास मान्यता मिळते तशाचप्रकारे बैलगाडा शर्यती सुद्धा आमदार निधीतून घेण्यास मान्यता द्यावी. मी सुद्धा अशा प्रकारची परवानगी द्यावी, अशी विनंती करतो.

सभापती महोदय, या सर्व बाबी करीत असताना शिक्षण व आरोग्यावर सुद्धा मोठ्या प्रमाणात तरतूद केली आहे. सभागृहात माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री आहेत. देशातील होतकरु युवकांना येथेच वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळावी म्हणून पदव्युत्तर शिक्षणाच्या प्रवेश क्षमतेत सुद्धा राज्य सरकारने लक्षणीय वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. याचाच अर्थ जेवढे विद्यार्थी पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी बसतात त्या तुलनेत जास्त प्रवेश क्षमतावाढ करण्यात येत आहे. परंतु आपण सर्वांनी विचार केला पाहिजे की, वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी देशातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात युक्रेमध्ये का

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे.....

जातात. संपूर्ण हिंदुस्थानातून एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी युक्रेमध्ये जात असतील तर आपण त्या बाबतीत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी अगोदर उल्लेख केला की, संभाजीनगर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सभाजीनगरमध्ये आयआयएम स्थापन करण्याबाबतची घोषणा १०-१५ वर्षांपूर्वी झाली होती. परंतु २०१४ मध्ये सदरहू आयआयएम संभाजीनगर ऐवजी नागपूरला नेण्यात आले. त्यावेळी मराठवाडा येथे आयआयएम ऐवजी स्कूल ऑफ प्लॅनिंग अँड आर्कीटेक्चर करण्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी केली होती. परंतु अद्यापपावेतो आर्कीटेक्चर कॉलेज मराठवाड्यात सुरु झालेले नाही, किंबहुना सुरु होण्याची कोणतीही शक्यता येणाऱ्या काळात दिसत नाही. आयआयएम नागपूरला का दिले हे मुळीच म्हणणार नाही. मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, राज्य सरकारने मराठवाड्यामध्ये लवकरात लवकर स्कूल ऑफ प्लॅनिंग अँड आर्कीटेक्चरची स्थापना करावी.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागांतर्गत "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या कार्यक्रमांतर्गत राज्यातील महापुरुषांशी संबंधित असलेल्या गावांतील १० शाळांची निवड करण्यात आली आहे. परंतु त्यामध्ये मराठवाड्यातील एकाही शाळेचा समावेश नाही. यामध्ये विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र अशाप्रकारे राज्यातील सर्व भागातील शाळा आहेत. परंतु मराठवाड्यातील एकाही शाळेचा समावेश नाही. मी निदर्शनास आणून देतो की, वेरुळ हे छत्रपती शिवरायांचे मूळ गाव आहे. मालोजीराजे भोसले वेरुळ येथील आहेत. राज्य सरकारने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत ज्या शाळांची निवड केली आहे त्यात एक शाळा वेरुळला व्हावी, अशा प्रकारची विनंती मी करतो. मी बार्टी किंवा सारथी या संस्थांच्या बाबतीत फार काही बोलत नाही.

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे.....

सभापती महोदय, मुंबईतील झोपडपट्टी सुधारण्यासाठी ज्याप्रमाणे स्वतंत्र निधी उपलब्ध होतो, त्याच धर्तीवर म्हाडाच्या मुंबईबाहेरील विभागीय मंडळाच्या क्षेत्रातील झोपडपट्ट्यांमधील मूलभूत कामे करण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. मुंबई, पुणे, ठाणे यासारख्या महानगरपालिका श्रीमंत आहेत. परंतु उर्वरित महानगरपालिका श्रीमंत नाहीत. मुंबईतील ५०० चौ.फुटाच्या सदनिका धारकांना मालमत्ता करात सूट देण्याबाबतच्या विषयावर काल-परवा सभागृहात चर्चा झाली. परंतु त्यावेळी कोणीही सत्य बोलले नाही. मी सांगू इच्छितो की, मुंबई महानगरपालिका ही श्रीमंत असल्यामुळे ती महापालिका अशाप्रकारे मालमत्तेत सूट देऊ शकते, परंतु बाकीच्या महापालिका श्रीमंत नसल्यामुळे त्या अशा प्रकारे सूट देऊ शकत नाहीत. मुंबईबाहेरील झोपडपट्ट्यांचा विकास करण्यासाठी अजून तरतूद वाढविता आली तर निश्चितपणे वाढविली पाहिजे, असे मला वाटते.

सभापती महोदय, ही सर्व विकास कामे होत असताना रेल्वे मार्गाच्या विकासासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार स्वतंत्रपणे काम करीत असते. माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धवजी ठाकरे आणि माननीय रेल्वे राज्यमंत्री आदरणीय श्री.रावसाहेब दानवे हे दोन-तीन महिन्यापूर्वी एका कार्यक्रमात एकत्र आले होते. त्यावेळी संभाजीनगर ते पुणे असा रेल्वे मार्ग प्रकल्प हाती घेण्याची चर्चा झाली होती. राज्य सरकारने या मार्गासाठी भूसंपादन केले तर केंद्र सरकार निश्चितपणे संभाजीनगर-पुणे हा रेल्वे मार्ग करु शकते. इतर रेल्वे मार्गांचा विचार होत असताना संभाजीनगर-पुणे या रेल्वे मार्गाचा विचार करण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

श्री. अंबादास दानवे ....

शिर्डीच्या विमानतळाचा विकास होत आहे आणि त्यासाठी निधी दिलेला आहे. परंतु त्याबरोबर संभाजीनगरच्या विमानतळ विस्तारीकरणात भूसंपादनासाठी देखील राज्य सरकारचा वाटा आवश्यक आहे. त्यामुळे तो सुध्दा राज्य सरकारने या विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी दिला पाहिजे. कारण हे आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. आपण त्यासाठी देखील अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, हिंदुत्वावर सन्माननीय विरोधी पक्षनेते बोलले की, हे सरकार हिंदुत्व विसरलेले आहे. हिंदुत्व म्हणजे काय ? हिंदुत्वाची व्याख्या अतिशय व्यापक आहे. आता त्यावर चर्चा करण्याची वेळ नाही. सरकारने मागच्या काळात आपल्याकडे ४ वेगवेगळ्या पध्दतीचे तीर्थ आहेत, १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यांच्या विकासाची घोषणा केली असताना या अर्थसंकल्पात अष्टविनायकाच्या विकासाची देखील घोषणा केली आहे. भारतीय जनता पार्टीची हिंदुत्वाची भूमिका वेगळी असेल, शिवसेनेची वेगळी असेल, परंतु ही भूमिका ठेवत असताना, या सरकारने साडे तीन पीठांचा सुध्दा अशाच पदतीने विकास करावा अशी सुध्दा माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आपण नांदेडचे आहात. आपल्याकडे माहूर, तुळजापूर, कोल्हापूर, वणी आहे. त्यामुळे या साडे तीन पीठांचा देखील विकास अष्टविनायकाबरोबर व्हावा अशी मी सरकारला विनंती करतो. वेगवेगळ्या पध्दतीने घोषणा झाल्या आहेत. वेगवेगळ्या पध्दतीने आरोप देखील झाले आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुद्रांक शुल्काबाबत आरोप केला होता की, बिल्डरांना धार्जिणे व्हावे म्हणून मुद्रांक शुल्क या सरकारने कमी केला आहे. मुद्रांक शुल्क पाहिला तर महाराष्ट्राचा मुद्रांक शुल्क ५ टक्के आहे, गुजरातचा मुद्रांक शुल्क ४.९ टक्के आहे, कर्नाटकचा मुद्रांक शुल्क ३ टक्के आहे. आता असे बोलायचे झाले तर या राज्याने याच कामासाठी केले का हा आपल्यामार्फत मी प्रश्न विचारु इच्छितो. परंतु मला असे वाटते की, मुद्रांक शुल्कामुळे निश्चित आजच्या काळात बांधकाम व्यवसायात तेजी येऊ शकते. सरकारने मुद्रांक शुल्काबाबतीत अतिशय योग्य निर्णय घेतला आहे. औरंगाबादचे नाव संभाजीनगर करण्याविषयी विरोधी पक्षाच्या सर्व मंडळींनी

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री. अंबादास दानवे ....

वेगवेगळ्या पध्दतीने आवाज उठविला आहे. मी यातील एक साक्षीदार आहे. दिनांक ८ मे, १९८८ हा दिवस आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी संभाजीनगर नावाची घोषणा दिनांक ९ मे, १९८८ ला संभाजीनगरात केली. युतीचे सरकार आले. मराठवाड्यात पहिली बैठक झाली, त्या दिवशी पहिल्या कॅबिनेटमध्ये या संदर्भातील ठराव मंजूर झाला होता. सदर बाबतीतील प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले. भारतीय जनता पक्षाची सर्व मंडळी संभाजीनगर करा असे म्हणतात. राज्यात ५ वर्षे भारतीय जनता पार्टीचे मुख्यमंत्री होते. आम्ही २५ वेळा सर्व कॅबिनेटला भेटलो. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे साहेबांना देखील माहीत आहे. संभाजीनगरला कॅबिनेट होती. त्यावेळी आम्ही सर्वांना भेटलो होतो. ५ वर्षे संभाजीनगर करण्याबाबत भारतीय जनता पार्टीला जाग आली नाही का, ५ वर्षे भारतीय जनता पार्टी झोपली होती का ? आता सातत्याने सर्वजण संभाजीनगरविषयी बोलत आहेत. मी आठवण करतो की, याच सभागृहात मागणी केली होती. ....(अडथळा).... शिवसेनेने मागणी केली होती. भाजपच्या मुख्यमंत्र्यांनी ऐकले नव्हते. मी हे स्पष्ट सांगतो. सभागृहाने मागच्या डिसेंबरमध्ये संभाजीनगरचे जे चिखलठाणा विमानतळ आहे त्याचे नाव धर्मवीर छत्रपती संभाजीराजे भोसले करण्याचा निर्णय विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी घेतलेला आहे. आपला प्रस्ताव दीड वर्षे केंद्र सरकारकडे पडून आहे. परंतु या संभाजीनगरच्या चिखलठाणे विमानतळाचे नाव संभाजीराजे विमानतळ केंद्र सरकारने केले नाही. कोणी तरी विधानसभेत म्हणते की, मी केंद्रात बसून हे करतो, ते करतो. मला वाटते की, सर्वात आधी संभाजीनगरच्या विमानतळाचे नाव संभाजीराजे विमानतळ लवकरात लवकर करावे. निश्चितपणे औरंगाबादचे नाव संभाजीनगर याच महाविकास आघाडीच्या काळात झाल्याशिवाय राहणार नाही असे मी सांगू शकतो.

सभापती महोदय, मी सरकारला काही मागण्या करु इच्छितो. मी नदीजोड प्रकल्पाविषयी बोललो. मराठवाडा वॉटर ग्रिडविषयी बोललो. संभाजीनगर विमानतळाविषयी देखील बोललो. ग्रंथालयाचा एक महत्त्वाचा विषय आहे. सन

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री. अंबादास दानवे ....

२०१३ पासून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये, वाचनालये यांची अवस्था अतिशय बिकट आहे. ग्रंथालयाच्या अनुदानाचे मागच्या वर्षीचे ४६ कोटी ३४ लाख रुपये अजून बाकी आहेत. राज्यात १२८५८ ग्रंथालये आहेत. थकीत ४६ कोटी रुपये देखील मिळालेले नाहीत. येणाऱ्या वर्षाची १२२ कोटी रुपयांची देखील तरतूद अर्थसंकल्पामध्ये झालेली नाही. आपण एकीकडे वाचन संस्कृती निधीसाठी, पुस्तकाच्या गावासाठी योजना मागतो आणि जी ग्रंथालये सुरु आहेत त्यांना मात्र कोणतेही अनुदान देत नाही. मी सरकारचे लक्ष या ग्रंथालयाच्या मागणीकडे वेधू इच्छितो. अनुदानात वाढ व्हावी. किमान थकीत अनुदान सरकारने लवकर दिले पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, माझी एक मागणी आहे. कोविडच्या काळात लॉकडाऊनमध्ये काही विद्यार्थ्यांवर वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहेत. जीवनावश्यक वस्तू आणायला जाताना गुन्हे दाखल आहेत. लॉकडाऊनचा वेळ ११ वाजताचा आहे, ११.०५ झाले तर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अनेक विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल आहेत. आज वेगवेगळ्या भरती होत आहेत. युपीएससी, एमपीएससी परीक्षा होत असताना त्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत. सर्व अशा पध्दतीचे हे गुन्हे आहेत. मी सर्व गुन्हे असे म्हणत नाही. परंतु लॉकडाऊन असताना बाहेर गेल्यावरील हे गुन्हे आहेत. ५ मिनिटे, १० मिनिटे उशीर झाला तर गुन्हा दाखल झाला आहे. अनेक पालक आम्हाला भेटत आहेत. येणाऱ्या काळात यांची अडचण होईल. नोकरीसाठी कॅरेक्टर सर्टिफिकेट लागते. पोस्ट, बँक यांची भरती सुरु आहे. विरोधी पक्ष देखील याबाबत सहमत असेल की, या विद्यार्थ्यांवरील हे गुन्हे लवकर मागे घ्यावेत. मी या संदर्भात विनंती करतो.

सभापती महोदय, मराठवाड्यातीलच नव्हे तर सर्व ठिकाणचा एक मुद्दा आहे. नवजात बालकांचा मृत्यू हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. अनेक ठिकाणी रुग्णालये झाली आहेत, पण तेथपर्यंत पोहोचणे, येणे अतिशय जिकरीचे काम आहे, विशेषत: ग्रामीण

असुधारित प्रत

श्री. अंबादास दानवे ....

भागातील अवस्था आहे. नवजात बालकांच्या मृत्यूचे प्रमाण १७ पेक्षा वर नसावे असा मिलेनिअम डेव्हलपमेंट गोल आहे. परंतु आपल्याकडे त्याचे प्रमाण २९ च्या आसपास आहे. माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. ते निश्चितपणे याची नोंद करतील. मरावाड्यामध्ये निओनटल ॲम्ब्युलन्स लहान, नवजात बालकांसाठी आवश्यक आहे. अर्थसंकल्पात संपूर्ण राज्यासाठी याची व्यवस्था करावी, विशेषत: मराठवाड्यासाठी करावी.

सभापती महोदय, आपण हापूस आंब्याविषयी बोलतो. मराठवाड्यात केसर आंबा सुध्दा महत्त्वाचा आहे. हापूस आंब्याची निर्यात करणे, उत्पादन वाढविणे या सर्व विषयी आपण चर्चा करतो. माठवाड्यात केसर आंबा महत्त्वाचा आहे आणि त्यासाठी केंद्र सरकारने जीआाय टॅग देखील दिला आहे. जगभरात हा केसर आंबा पोहोचण्यासाठी सरकारने वेगवेगळ्या प्रकारचे प्रकल्प हाती घ्यावेत अशी मी विनंती करतो. हे सरकार अतिशय जाणीव असलेले सरकार आहे. अत्यंत संवेदनशील सरकार आहे. मी याचे एक उदाहरण सांगतो. तालुका त्र्यंबकेश्वर येथे खारशेत ठिकाण आहे. आदिवासी भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न साडविण्यासाठीचे हे उदाहरण आहे. आदिवासी बांधव पिण्याच्या पाण्यासाठी एका साध्या लाकडाहून एका बाजुने दुसऱ्या बाजुला जात होते. सकाळ दैनिकातील हा फोटो आहे. माननीय मंत्री श्री. आदित्य ठाकरे साहेबांनी अतिशय संवेदनशीलतेने दुसऱ्या, तिसऱ्या दिवशी तेथे जाऊन पूल बांधावयास लावला. आदिवासी बांधवांना ताबडतोब मदत झाली. मागच्या कित्येक वर्षांपासून असलेला हा प्रश्न कोणी मांडला नव्हता. माध्यमांच्या सहाय्याने हा प्रश्न समोर आला. माननीय मंत्री श्री. आदित्य ठाकरे साहेबांनी त्वरित जाऊन हा प्रश्न सोडविण्यासाठी काम केले. सरकार अत्यंत संवेदनशील आहे आणि या संवेदनशील सरकारने मांडलेला अर्थसंकल्प शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या हिताचा आहे असे मी मानतो. मी अर्थसंकल्पाविषयी सरकारचे अभिनंदन करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद ! जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री. अंबादास दानवे ३७ मिनिटे का बोलले यावर माझा आक्षेप नाही. पण आता सभागृहाची बैठक संपण्यासाठी ६ मिनिटे शिल्लक राहिले आहेत. माझी विनंती आहे की, मी उद्या सकाळी पहिल्यांदा भाषण करतो. कारण मला भाषणासाठी २०-२२ मिनिटे लागणार आहेत. मी विदर्भ, मराठवाडा या संदर्भातील विषयांवर बोलणार आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दटके यांना विनंती करतो की, त्यांनी बोलावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत आसगावकर यांनी बोलावे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महादेय, सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दटके यांचा भाषणासाठी क्रमांक आहे. ते महत्त्वाच्या विषयावर बोलणार आहेत. ते उद्या सभागृहात उपस्थित राहणार नाहीत.

श्री. जयंत आसगावकर : सभापती महोदय, मी ५ मिनिटे बोलणार आहे. जास्त बोलणार नाही. नवीन सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे.

**तालिका सभापती** : उद्या सकाळी पहिल्यांदा तुम्ही बोलावे.

श्री. जयंत आसगावकर : सभापती महोदय, ठीक आहे.

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दटके (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपले, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे व सन्माननीय सदस्य श्री. जयंत आसगावकर यांचे आभार मानतो. कारण आपण मला बोलण्यास संधी दिली आहे.

सभापती महोदय, मी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी उभा आहे. अर्थसंकल्पाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसले की, जुन्याच घोषणांचे रिपॅकेजिंग यामध्ये आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमोल मिटकरी बोलत होते की, मी एक-एक पान भाषण वाचले आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पाचे मागचे भाषण आणि हे भाषण मी पाहिले आहे.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

हे मी बघितले तेव्हा ५० टक्के भाषण तसेच आहे. मी नवीन सदस्य आहे. दरवर्षी असे होते की, यावर्षीच असे झाले याची मला माहिती नाही. मी दोन्ही भाषणे वाचली आहेत. त्या भाषणात ५० टक्के मुद्दे तेच आहेत. हा अर्थसंकल्प संपूर्ण महाराष्ट्राचा आहे की, फक्त पुणे, मुंबई किंवा काही शहरांपुरता मर्यादित आहे याची मला भीती वाटते. नागपूर, अमरावती, अकोला, औरंगाबाद, लातूर, नांदेड, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण असे शब्द या अर्थसंकल्पात फार कमी आहेत. पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, एमएमआर रिजन असे शब्द खूप वेळा आले आहेत. म्हणून मला अशी भीती वाटते की, हा अर्थसंकल्प महाराष्ट्राचा आहे की, फक्त साडेतीन, चार, पाच जिल्ह्याकरीता आहे. अशी माझी सरकारला विचारणा आहे.

सभापती महोदय, नागपूर हे उप राजधानीचे शहर आहे. माझे असे म्हणणे नाही की, एकट्या नागपूरसाठी निधी द्या. संपूर्ण महाराष्ट्राला निधी द्यायला पाहिजे. अर्थमंत्री महोदय श्री.अजित पवार यांचे प्रेम व अर्थ राज्यमंत्री महोदय श्री.शंभूराज देसाई यांचे प्रेम पुणे व सातारा या शहरावर असू शकते. मी असतो तरी तसेच झाले असते. असे प्रेम ठेवत असताना अर्थमंत्री व उप मुख्यमंत्री हे संपूर्ण महाराष्ट्राचे आहेत. श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे हे संपूर्ण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. माननीय श्री.शंभूराज देसाई संपूर्ण महाराष्ट्राचे अर्थ राज्यमंत्री आहेत. बजेटमधील निधीचे वाटप करीत असताना संपूर्ण महाराष्ट्रावर लक्ष राहू शकत नाही हे मला मान्य आहे. विदर्भ व मराठवाडा मागासलेला आहे. मागील पाच वर्षाच्या काळात माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते, श्री.चंद्रशेखर बावनकुळे मंत्री होते. त्या मंत्री मंडळात शिवसेनेचे अनेक मंत्री होते. त्या काळात विदर्भाला जास्त निधी मिळाला असेल कारण अनेक वर्षाचा अनुशेष होता. भाजपच्या सरकारने पुणे व मुंबईकडे दुर्लक्ष केले नाही. हीच भावना आमच्या मनात आहे. आपण पुणे व मुंबई शहरांना भरभरुन द्या. विदर्भ व मराठवाड्यावर कृपया अन्याय करु नका. अशी माझी अर्थमंत्री महोदयांना विनंती आहे. राज्य सरकारच्या अखत्यारित नागपूर महानगरात ४९ हजार किलोमीटरचे रस्ते आहेत. या रस्त्यांकरिता एखादे पॅकेज पुणे रिंगरोडच्या धर्तीवर,

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

मुंबईतील रस्त्यांच्या धर्तीवर नागपूरला द्यावे अशी माझी विनंती आहे. भारतीय जनता पक्षाचे सरकार असताना १०० कोटी महानगरपालिकेला, १०० कोटी एनआयटी व १०० कोटी राज्य सरकार असे पॅकेज दरवर्षी नागपूर शहरासाठी मिळत होते. आता आपण १०० कोटी रुपये देऊ शकत नसान तर किमान दरवर्षी ५० कोटी रुपयांचे पॅकेज राज्य सरकारच्या रस्त्यांसाठी द्यावे यासाठी या बजेटमध्ये त्याचा समावेश व्हावी अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. नागपूर महानगरात तसेच देशात स्मार्टसिटी प्रकल्प सुरु आहेत. या प्रकल्पात काही जागा तलावांसाठी आरक्षित आहेत. पिण्याचे पाणी हे शहरांसाठी खूप अडचणीचा विषय झालेला आहे. धरणातील पाणी शेतीसाठी पहिले की, पिण्यासाठी पहिले असे विषय अनेक ठिकाणी निर्माण झाले आहेत. त्यामुळे जेथे स्मार्टसिटी प्रकल्प होत आहेत तेथे मोठ्या प्रमाणात नवीन तलाव निर्माण केले तर त्याचा वापर मोठ्या शहरात पिण्याच्या पाण्यासाठी होईल. तलाव निर्माण करण्यासाठी शासनाने निधी द्यावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, माननीय श्री.सुनील केदार हे क्रीडामंत्री आहेत, पुणे येथील बालेवाडी येथे मोठी स्पोर्ट युनिर्व्हसिटी होत आहे. त्याच धर्तीवर केंद्र शासनाच्या माध्यमातून नागपूर येथे स्पोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया यांच्या मार्फत विभागीय क्रीडा संकुल तयार होत आहे. राज्य सरकारचे विभागीय क्रीडा संकुल नागपूर येथे आहे. बालेवाडीच्या धर्तीवर नागपूर यथे एक छोटी डीम्ड युनिर्व्हसिटी करावी. देशाचे मध्यवर्ती केंद्र नागपूर येथे आहे. नागपूर येथे विमानतळ आहे, रेल्वे स्टेशन आहे, बसने येण्याजाण्याची सोय आहे. तेथून चार-चार हायवे गेले आहेत. खेळाडूंना तेथे पोहचणे सोपे जाईल. बालेवाडीच्या धर्तीवर नागपूर येथे छोटी डीम्ड युनिर्व्हसिटी व्हावी अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. काल विधानसभेमध्ये नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी अर्थमंत्री महोदयांनी १०० कोटी रुपये मंजूर केले. त्याकरिता माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी बैठक घेतली होती. त्या बैठकीनंतर या विषयाबाबत कोणतीही कार्यवाही झाली नव्हती. माननीय अर्थमंत्री श्री.अजित पवार यांच्यावर माझा विश्वास आहे. ते शब्द देतात तो खरा होतो. अर्थ

श्री.प्रवीण दटके....

राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयाकरिता जो निधी अलॉट केला तो वितरीत करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, नागपूर शहरात दोन ते तीन मेडिकल कॉलेज आहेत. परंतु जिल्हा रुग्णालय नाही.

**तालिका सभापती (अमरनाथ राजूरकर)** : सन्माननीय सदस्य श्री.प्रवीण दटके आपण ऑनलेग रहावे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पावर आणखी पाच ते सहा सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करायचे आहेत. त्यामुळे उद्या सकाळी ही चर्चा ९.०० वाजता सुरु करावी.

**तालिका सभापती** : या संदर्भातील निर्णय सभापती महोदय घेतील. आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी ११.४५ ते १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

## माननीय विरोधी पक्षनेत्यांवर दाखल करण्यात आलेल्या एफआयआरबाबत

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, आघाडी सरकारचे ज्याप्रमाणे सुडाचे राजकारण सुरु आहे....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांना सांगू इच्छितो की, आपण प्रथम विषय सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावा.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांच्याविरुद्ध कोणी तरी तिऱ्हाईत माणसाने तक्रार केल्यामुळे एफआयआर दाखल करण्यात आला आहे. खरे म्हणजे त्यांचा प्रिव्हिलेज आहे, अधिवेशन सुरु आहे. ते मजूर सोसायटी गटाचे सभासद नाहीत, ते मजूर सोसायटी गटातून निवडून आलेले नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांपैकी अनेक लोक मजूर सोसायटी गटातून निवडून आलेले आहेत, परंतु ते मजूर नाहीत. मग असे असताना केवळ माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांच्यावरच एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. कारण ते रोज सभागृहात सरकारला अडचणीत आणणारे प्रश्न उपस्थित करतात, ठराव मांडतात. त्यामुळे सरकारकडून सुडाचे राजकारण होत आहे. मी या सुडाच्या राजकारणाचा निषेध करतो. त्यांच्यावर जो एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे तो रद्द करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी विरोधी पक्षाच्या प्रतोदांना सांगू इच्छितो की, सरकारकडे या विषयाची चौकशी करुन ती माहिती सभागृहासमोर ठेवीन.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

---------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**राज्यातील अनुदानप्राप्त उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव शिक्षक पदांना मान्यता देण्याबाबत**

**(१) * ११९३९ श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १०० टक्के अनुदानप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००३-२००४ ते २०१८-२०१९ या कालावधीत वाढीव विद्यार्थी संख्येमुळे शिक्षक संच निर्धारणात वाढीव शिक्षक पदे मंजूर करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संच निर्धारणातील वाढीव शिक्षक पदावर नियमानुसार नियुक्त्या करण्यात आल्या व सदर नियुक्त्यांना विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मान्यता प्रदान केली, तथापि, संच निर्धारणातील वाढीव शिक्षक पदांना मान्यता प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असल्याने वाढीव पदावर कार्यरत शिक्षक वेतनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद समितीतर्फे मुंबई येथे दिनांक २ सप्टेंबर, २०२१ पासून आंदोलन करण्यात आले, तसेच दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजी मा.शिक्षण मंत्री यांच्या बंगल्यासमोर निदर्शने करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांमधील तसेच उच्च माध्यमिक शाळांमधील सन २००३-०४ ते २०१०-११ या कालावधीतील व्यपगत पदांना व सन २०११-१२ ते २०१८-१९ या कालावधीतील उच्च माध्यमिक शाळांतील वाढीव पदांना मान्यता प्रदान करण्याबाबतचा वित्त विभागाकडे अभिप्रायार्थ सादर करण्यात आलेल्या प्रस्तावासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, मान्यतेकरीता प्रलंबित असलेले प्रस्ताव निकाली काढून, दिर्घ काळापासून विनावेतन काम करणाऱ्या कनिष्ठ

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी

बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

ता.प्र.क्र.११९३९......

महाविद्यालयीन शिक्षकांना वेतन अदा करण्याबाबत तसेच वाढीव पदांना मान्यता प्रदान करुन निधी उपलब्ध देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२), (३), (४) व (५) सन २००३-२००४ ते २०१८-२०१९ या कालावधीतील उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव पदाचा प्रस्ताव अभिप्रायार्थ वित्त विभागास सादर करण्यात आला होता. वित्त विभागाने त्यांचे अभिप्राय उपलब्ध करून दिले असून प्रस्तावाबाबत सामान्य प्रशासन विभागाचेही अभिप्राय प्राप्त करून घेण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने प्रस्ताव अभिप्रायार्थ सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केला आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या वतीने आज आझाद मैदानावर आंदोलन सुरु आहे. त्यांचे अध्यक्ष श्री.संजय शिंदे यांनी मंत्री महोदयांसमवेत चर्चा केली. आम्ही सुद्धा मंत्री महोदयांना विनंती केलेली आहे. वाढीव पदांना मान्यता मिळावी हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सभापती महोदय, या संदर्भात तातडीने आपल्या दालनात बैठक आयोजित करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सदर तारांकित प्रश्नाबाबत माझ्या दालनात बैठक आयोजित करण्यात येईल, असे मी मंत्री महोदयांना निर्देश देत आहे.

--------

असुधारित प्रत

## कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील गावांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(२) * १२२७२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील नांदगाव, असलदे, कोळोशी, हडपीड, तोंडवली-बावशी तसेच कासार्डे इ. गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या पियाळी नदीपात्रामध्ये सिलीका वॉशिंगचे गढूळ पाणी सोडत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दूषित पाणीमुळे गावातील ग्रामस्थांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्यामुळे शासनाने संबंधितांना नदीपात्रात सिलीका वॉशिंगचे दूषित पाणी सोडण्यास कायमस्वरूपी बंदी घालावी अशा मागणीचे एक सविस्तर निवेदन मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग जिल्हा आदींकडे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, सदरहू निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने गावातील ग्रामस्थांना शुध्द व पिण्यायोग्य सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ग्रामपंचायत कोळोशी, व ग्रामपंचायत, नांदगाव, ता.कणकवली यांनी पियाळी नदीपात्रामध्ये सिलीका वॉशिंगचे गढूळ पाणी सोडत असल्याबाबत नोव्हेंबर, २०२१ मध्ये तहसिलदार, कणकवली यांच्याकडे तक्रार केली होती.

(३) उक्त तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी, नांदगाव ता.कणकवली यांचेमार्फत स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे. तसेच निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उपप्रादेशिक कार्यालय, रत्नागिरी यांना उक्त प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पाहणी करून प्रचलित कायद्यातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याबाबत तहसिलदार, कणकवली यांच्यामार्फत कळविण्यात आले आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

ता.प्र.क्र.१२२७२.....

श्री.गुलाबराव पाटील.......

कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील नांदगाव, असलदे, कोळोशी, हडपीड, तोंडवली-बावशी तसेच कासार्डे येथील ग्रामपंचायतीच्या नळ योजनांचे उद्भव व सार्वजनिक विहिरी पियाळी नदीपात्रालगत अस्तित्वात आहेत. पियाळी नदीपात्रालगत नांदगाव येथे १ सार्वजनिक विहीर, असलदे येथे २ सार्वजनिक विहीरी, कोळोशी येथे नळ योजनेची १ उद्भव विहीर, तोंडवी-बावशी येथे २ उद्भव विहिरी आहेत. कासार्डे येथे थेट नदीपात्रात कोणताही उद्भव नसल्याने नियमित पाणी गढूळ होत नाही. सदर विहिरींमध्ये नियमित TCL पावडर व तुरटी टाकून पाण्याचे शुध्दीकरण करून गावाला शुध्द पाण्याचा पुरवठा केला जातो.

माहे डिसेंबर-२०२१ या कालावधीत नांदगाव, असलदे, कोळोशी, हडपीड, तोंडवली-बावशी तसेच कासार्डे या गावातील एकूण ६९ स्त्रोतांचे विहिरीचे पाणी नमुने रासायनिक तपासणीकरीता पाठविले असता प्रयोगशाळेच्या तपासणी अहवालानुसार सर्व पाणी नमुने पिण्यास योग्य असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

---------

असुधारित प्रत

## ता.प्र.क्र.१२७१५ बाबत

श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सभापती महोदय, सदर तारांकित प्रश्न मुस्लिम आरक्षणाबाबत आहे. संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे सदर तारांकित प्रश्न राखून ठेवण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सदर तारांकित प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे.

---------

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य व ेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**वरिष्ठ महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राह्य धरणेबाबत**

**(४) * १२२८१ डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १०३७९ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ महाविद्यालयातील सन १९९१ ते २००० या कालावधीत सेवेत आलेल्या बिगर नेट/सेट पात्रताधारक अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राह्य धरुन त्यांना इतर सर्व अनुषंगिक लाभ देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने व मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार संबंधित याचिकाकर्त्यांना त्यांच्या सेवा ग्राह्य धरुन सर्व लाभ देण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन न्यायालयात न गेलेल्या त्या समान इतर अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियुक्ती दिनांकापासून ग्राह्य धरुन अनुषंगिक लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १९/०९/१९९१ च्या अधिसूचनेनुसार अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयात अध्यापक म्हणून नियुक्त होण्यासाठी नेट/सेट अर्हता विहित केलेली आहे. सदर शैक्षणिक अर्हता शासन निर्णय दिनांक २३/१०/१९९२ नुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना लागू करण्यात आलेली आहे. दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांनी त्यांच्या सेवाकालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केली नाही, अशा अध्यापकांच्या सेवा शासन निर्णय दिनांक २७/०६/२०१३ अन्वये काही अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन निर्णयाच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरहू शासन निर्णयाच्या विरोधात

श्री.उदय सामंत.......

मा.उच्च न्यायालय, मुंबई तसेच औरंगाबाद व नागपूर खंडपीठ येथे नेट/सेट अर्हतेबाबत दाखल असलेल्या सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार या. क्र.२०८२/२०१३ व इतर समविषयाच्या याचिकांवर दिनांक २३/१२/२०१५ रोजी एकत्रित सुनावणी झाली व त्यामध्ये शासन निर्णय दिनांक २७/०६/२०१३ वैध ठरविला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल झालेल्या असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे. दरम्यान मा.उच्च व मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/ सेट अध्यापकांना त्यांच्या मूळ नियुक्तीचा दिनांक ग्राह्य धरुन तत्कालीन प्रचलित धोरणानुसार सेवानिवृत्तीवेतन लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार दिनांक २९/१०/२०२१ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

---------

असुधारित प्रत

## ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५) * १२३४२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी अशी शिक्षण विभागातील महत्वाची पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे अन्य अधिकाऱ्यांना इतर विभागांचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे, सदर अधिकारी मूळ आस्थापनेच्या जागेवर अधिक वेळ काम करित असून उरलेला वेळ प्रभारी पदासाठी देतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रभारी अधिकारी अपेक्षित काम करत नसल्याने गाव, तालुक्याच्या ठिकाणाहून जिल्हा परिषदेत कामाकरीता येणाऱ्या शिक्षकांना वारंवार ये-जा करावी लागते, अशी तक्रार ठाणे जिल्हा शिक्षक भारती संघटनेने जिल्हा परिषदेच्या वरिष्ठांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रिक्त पदांमुळे शिक्षकांचे प्रश्न प्रलंबित राहिले असून, विभागात प्रभारी अधिकाऱ्यांमुळे गैरव्यवहाराचे, लाचखोरीचे प्रमाण वाढले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) असे निवेदन सदर कार्यालयास प्राप्त नाही.

(४) हे खरे नाही.

(५) रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रवींद्र फाटक : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना दोनच प्रश्न विचारणार आहे.....

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक २५ मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी १२.०४ ते १२.३० पर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री.सांगळे.....

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

ता.प्र.क्र.१२३४२....

**उप सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक १२३४२......

श्री.रवींद्र फाटक : सभापती महोदया, ........

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदया, आमचा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे...

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मी आपल्याला बोलण्याची संधी देते...

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

श्री.रवींद्र फाटक : सभापती महोदया, सदर तारांकित प्रश्नासंबंधी मंत्री महोदयांनी त्यांच्या दालनात बैठक घेतल्यास माझी काही हरकत नाही.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सदर विषयासंबंधी माझ्या दालनात बैठक घेतली जाईल.

श्री.रवींद्र फाटक : सभापती महोदया, ठीक आहे.

---------

असुधारित प्रत

**राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांना स्थायी सेवेची संधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(६) * १२७५८ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळेमध्ये सन २०१३ ते २०१९ पर्यंत कार्यरत असलेल्या कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांना सेवेत पुन्हा सामावून घेऊन, त्यांच्या झालेल्या सेवेचा विचार करून स्थायी सेवेची संधी उपलब्ध करून देणेबाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांना स्थायी सेवेची संधी उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा.उच्च न्यायालयाने अंतिम आदेश अद्याप दिलेले नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.किरण सरनाईक : सभापती महोदया, सदर तारांकित प्रश्नामधील विषय न्यायप्रविष्ट असल्यामुळे सुटत नाही असे शासनाच्या वतीने वांरवार उत्तर दिले जाते. राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांना स्थायी सेवेची संधी मिळणार आहे की नाही ? त्यांना सदर सेवेची मिळणार असल्यास ती कधीपर्यंत दिली जाणार आहे ?

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)



असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांची पूर्वी निदेशकांची पदे होती. त्यानंतर ती पदे बेस लेक्चरची झाली. या संदर्भात कोर्ट केस सुरु आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सभापती महोदया, मी या संदर्भात आपल्यासमवेत चर्चा करते. आपण या संदर्भात बैठक घेऊ.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

**उप सभापती** : ठीक आहे.

-----------

असुधारित प्रत

**तारांकित प्रश्न क्रमांक ११८०६ संबंधी**

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदया, सदनात संबंधित विभागाचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत. सभापती महोदया, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण हा तारांकित प्रश्न राखून ठेवावा.....

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

**उप सभापती** : सदरहू तारांकित प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.... त्यापूर्वी सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे....

-----------

असुधारित प्रत

**<u>माननीय विरोधी पक्षनेते यांच्यावर दाखल केलेल्या एफआयआरसंबंधी</u>**

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदया, आज राज्यात माननीय विरोधी पक्षनेते यांच्यावर गुन्हा दाखल झाला. महाविकास आघाडी सरकारने कशा प्रकारे खोटे गुन्हे नोंदवायचे याची जंत्री सुरु केली आहे. ज्या गुन्हयामध्ये मुंबै बँकेच्या १० वेळा चौकशी करण्यात आली. त्या सर्व चौकशींच्या वेळी न्यायालयाने "No coercive action" अशा प्रकारे निदेश दिले. त्यात मजूर संस्थांचा देखील उल्लेख होता. तरी देखील आज. मुंबईतील एमआरए मार्ग पोलीस स्टेशनमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांच्यावर नव्याने गुन्हा दाखल करण्यात आला. राज्यात २५ हजार पेक्षा जास्त मजूर संस्था आहेत. ही बाब माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांना माहीत असावी.

**उप सभापती** : आपण यासंबंधी संपूर्ण तपशील वर्णन करणार असल्यास उलट त्यांची बदनामी होत आहे. आपण फक्त अन्याय झाल्यासंबंधीचा मुद्दा मांडावा.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदया, २५ हजार पेक्षा जास्त मजूर संस्थांमध्ये ९० टक्के सदस्य सत्ताधारी पक्षामधील आहेत. त्यात मंत्री, आमदार, मंत्री महोदयांचे भाऊ, नातेवाईक आहेत. ३५ जिल्हा बँकांमध्ये प्रत्येकी २ सदस्यांप्रमाणे मजूर संस्थांमधून निवडून येणारे ७० सदस्य हे कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षांचे आहेत. माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी मजूर संस्थेमधील राजीनामा दिला असून ते आता बँकिंगमधून निवडून आलेले आहेत. त्यामुळे आज त्यांच्यावर कोणत्या कारणास्तव व कशाकरिता गुन्हा दाखल झाला आहे ? सदर गुन्हयामध्ये भा.द.वि. कलम १९९, २००, ४०६, ४१७, ४२०, ४६५, ४६८ आणि १२० (ब) लावण्यात आली आहेत. याचा अर्थ ते प्लॅनर आहेत का ?

**उप सभापती** : आपण कोणत्या विभागाला उद्देशून प्रश्न विचारात आहात ?

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदया, मी गृह विभाग आणि सहकार विभागाच्या संदर्भात प्रश्न विचारत आहे. आमचा सरकारला हा प्रश्न आहे. मजूर सोसायटी कायद्यानुसार संस्थेची नोंदणी करीत असताना तो मजूर असावा लागतो. ही बाब

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड ....

बंधनकारक असते. त्यानंतर तो मजूर आहे किंवा नाही, याबाबत मजूर संस्था आणि कायद्यात कोणतीही तरतूद नाही. अशा परिस्थितीत संपूर्ण राज्यातील मजूर संस्था व त्यांच्या सदस्यांवर गुन्हे दाखल करणार आहात का ? सभापती महोदया, यापूर्वी मुंबै बँकेची चौकशी करण्यात आली. त्यात "No coercive action" ची तरतूद आहे. असे असताना देखील सदर गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हा रद्द करावा अशी आमची मागणी आहे. माननीय गृह मंत्री यांना आम्ही विचारणा करीत आहोत की, आपण आजच्या आज हा गुन्हा रद्द करणार आहात का ?

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सदनात अर्थसंकल्पावर चर्चा सुरु असताना सदनाचे माननीय विरोधी पक्षनेते यांच्यावर गुन्हा दाखल केला जातो. सरकारबद्दल यापेक्षा दुसरी शरमेची गोष्ट असू शकत नाही. त्यांच्यावर कशासाठी गुन्हा दाखल केला ? तर त्यांच्यावर जेवढे गुन्हे दाखल होते त्या सर्व गुन्हयांबद्दल याच पोलिसांनी सर्व समरी करुन टाकली होती. परंतु तुम्ही दादागिरी करुन पोलिसांवर बळजबरी करतात व त्यांच्यावर गुन्हे दाखल करीत आहात. कारण ते तुमचे वाभाडे काढतात, तुमचे चिथडे उडवतात. तुम्ही तोंड दाबण्याचा प्रयत्न केला तर आम्ही तुमच्या अशा धमक्यांना व गुन्हयांना भीक घालणार नाही. तुमची जेवढी लफडी व भानगडी असतील त्या दिवसेंदिवस जास्त प्रमाणात बाहेर निघाल्याशिवाय राहणार नाहीत. विरोधी पक्षनेत्यांवर गुन्हा दाखल केल्यामुळे कोणाला असुरी आनंद होत असेल, तसेच आज त्यांना सुपात टाकल्याचा तुम्हाला आनंद होईल. परंतु उद्या तुम्ही सर्व जात्यात येणार आहेत. आज राज्यातील मजूर संस्थांमध्ये अनेक आमदार, मंत्री, जिल्हा परिषदा, पंचायती समित्यामधील लोक तसेच अनेक नगरसेवक आहेत. तुम्हाला या सर्वांची लाईन निश्चितपणे लावावी लागेल. अन्यथा आम्ही शांत बसणार नाही. तसेच अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असताना माननीय विरोधी पक्षनेत्यांवर गुन्हा दाखल करुन तुम्ही रडीचा डाव खेळत

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

श्री.विनायक मेटे....

आहात. कारण माननीय विरोधी पक्षनेते शेतकऱ्यांची बाजू मांडत आहेत. याउलट तुम्ही करप्शन करीत आहात, भ्रष्टाचार करीत आहात. करोनामध्ये किती माणसे मारली, कोविड काळात त्यांच्याकडून किती भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे याबाबत ते माहिती सांगत असल्यामुळे तुम्ही त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये तुम्ही किती कोटी रुपये खाल्ले आहेत......

**उप सभापती** : आपण सर्वांनी शांत बसावे. आता सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी आपले म्हणणे मांडावे. त्यानंतर मी शासनाला सांगेन की, याबाबत काही वस्तुस्थिती असल्यास ती सदनामध्ये सांगावी.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदया, अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असताना माननीय विरोधी पक्षनेत्यांचा आवाज दाबता येतो का ? परंतु आम्ही सत्तेच्या जोरावर आवाज दाबू शकतो अशा प्रकारे वाईट पध्दतीने सरकारने आज वर्तणूक केलेली आहे. राज्यात ग्रामीण भागांमध्ये अनेक मजूर सोसायटया असून त्यात चेअरमन व संचालक कोण आहेत ?

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत .....

ज्यांच्याकडे मजूरीचे कार्ड आहे ते संचालक किंवा चेअरमन नाहीत. ग्रामीण भागात मजूर राजकीय लोकांच्याच मजूर सोसायटया आहेत. त्या सोसायटीवर कामे घेतल्याशिवाय त्यांना कामे करता येत नाहीत. मग असे असताना माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांनी राजीनामा दिल्यानंतर सोसायटीवरुन बँकेवर कसे आले. यापूर्वीच्या अनेक घटना आहेत.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती** : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्याने मी सभागृहाची बैठक २० मिनिटांसाठी स्थगित करते.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.४० ते १.०० वाजेपर्यत स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय,मला अतिशय खेद वाटत आहे की, .....अडथळा....

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, या सभागृहाचे माननीय विरोधी पक्ष नेते यांच्यावर सूडबुध्दीने कारवाई केलेली आहे. या राज्यामध्ये अनेक मजूर सोसायटीचे संचालक हे राजकीय पक्षाचे लोक आहेत. त्यामध्येही काँग्रेस-राष्ट्रवादीचे ८० टक्के लोक आहेत. ८० टक्के काँग्रेस-राष्ट्रवादीचे लोक.....(अडथळा)

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, या विधानपरिषदेची एक गरिमा आहे. विधानपरिषदेच्या विरोधी पक्ष नेत्यांविरुध्द एफआयआर दाखल केलेला आहे. या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रात कोणते चित्र जात आहे, याचा विचार करणे आवश्यक आहे. विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते यांच्या विरुध्द एफआयआर दाखल केला जात आहे, असे असताना देशामध्ये कोणते चित्र रंगविण्याचा प्रयत्न या सभागृहाच्या माध्यमातून होत आहे ? अशा पध्दतीने त्यामुळे सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज चालू देता कामा नये. .......अडथळा........सभापती महोदय,माननीय विरोधी पक्ष नेत्यांना अटक करा.........(अडथळा)......

-------------

असुधारित प्रत

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात. )

**पृ.शी./मु.शी. :** कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री.राजेंद्र पाटील-यड्रावकर (सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक २९ मार्च,२०१६ रोजी विधानपरिषद सभागृहात अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी तत्कालीन मा.राज्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासन क्रमांक २३८ च्या अनुषंगाने "स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत व शिव आरोग्य योजनेबाबतची माहिती" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

---------------

असुधारित प्रत

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देत असतात. )

**पृ.शी./मु.शी.:** धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे या संदर्भातील तदर्थ संयुक्त समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती आदिती तटकरे ( विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या संदर्भातील तदर्थ संयुक्त समितीचा अहवाल सभागृहाला सादर करते.

सभापती महोदय, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,१९५० च्या अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांना ( ज्यात शुश्रुषालय, प्रसूतिगृह,दवाखाने किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कुठलेही केंद्र यांचा समावेश होतो. ) शासनातर्फे देण्यात आलेली सवलत, मदत, सूट, माफी, इत्यादि आणि या रुग्णालयांमार्फत निर्धन व समाजातील दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या खाटा, करण्यात येणारा औषधोपचार, वैद्यकीय चाचण्या व तपासण्या, शस्त्रक्रिया इत्यादिंसाठी करण्यात येणारा खर्च या संदर्भातील सखोल तपासणी करुन शासनास शिफारशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या तदर्थ समितीने दिनांक ४ व ५ फेब्रुवारी,२०१६ रोजी पुणे येथे दिलेल्या भेटीसंदर्भातील अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

**सभापती :** धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे या संदर्भातील तदर्थ संयुक्त समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--------------

असुधारित प्रत

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देत असतात. )

**पृ.शी./मु.शी.:** नियम ९३ अन्वये सूचना

**सभापती :** माझ्याकडे आज रोजी दिनांक मंगळवार दिनांक १५ मार्च,२०२२ रोजी प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मी मान्य केलेल्या सूचना व त्यावरील माझे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहेत.

( प्रेस : येथे नियम ९३ च्या सूचना व त्यावरील निर्णय जोडावेत.)

----------

असुधारित प्रत

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देत असतात. )

**"नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांसाठी "पार्लमेंटरी रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटयूट फॉर डेमॉक्रसीस"(PRIDE) या प्रशिक्षण संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या अभ्यासवर्गाबाबत घोषणा**

**सभापती :** नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांसाठी लोकसभा सचिवालयातील "पार्लमेंटरी रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटयूट फॉर डेमॉक्रसीस" (PRIDE) या प्रशिक्षण संस्थेतर्फे संसद भवन, नवी दिल्ली येथे संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन दिनांक ५ व ६ एप्रिल,२०२२ रोजी करण्यात आले आहे. या अभ्यासवर्गासाठी समन्वयाची जबाबदारी राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा व वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र, विधान भवन,मुंबई यांच्याकडे आहे.

या संसदीय अभ्यासवर्गात सहभागी होण्यासाठी ज्या सन्माननीय सदस्यांनी आपली नावे कळविली आहेत त्यांनी दिनांक ५ व ६ एप्रिल,२०२२ रोजी लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली येथे होणाऱ्या या अभ्यासवर्गाची नोंद घ्यावी.

-----------

असुधारित प्रत

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देत असतात. )

## विशेष उल्लेखाच्या सूचना

**सभापती** : आज मंगळवार,दिनांक १५ मार्च,२०२२ रोजी म.वि.प. नियम १०१ (अ) अन्वये मला प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांपैकी मी मान्य केलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सदनाच्या पटलावर ठेवत आहे.

-----------------

असुधारित प्रत

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देत असतात. )

**सभापती :** अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक आता दिवसभराकरिता स्थगित करीत आहे.

सभागृहाची बैठक उद्या बुधवार, दिनांक १६ मार्च,२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता पुन्हा भरेल. सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. सदरहू विशेष बैठकीत अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा तिसरा व शेवटचा दिवस घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी १२.०० वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ४ मिनिटांनी बुधवार,दिनांक १६ मार्च,२०२२ च्या सकाळी १० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------------

असुधारित प्रत